# Ssshhh

AKKASH R THHATE

BlueRose ONE.com
Stories Matter
NewDelhi • London

**BLUEROSE PUBLISHERS**
India | U.K.

Copyright © Akkash R Thhate 2026

All rights reserved by author. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author. Although every precaution has been taken to verify the accuracy of the information contained herein, the publisher assumes no responsibility for any errors or omissions. No liability is assumed for damages that may result from the use of information contained within.

BlueRose Publishers takes no responsibility for any damages, losses, or liabilities that may arise from the use or misuse of the information, products, or services provided in this publication.

BlueRose ONE.com
Stories Matter
NewDelhi • London

For permissions requests or inquiries regarding this publication, please contact:

BLUEROSE PUBLISHERS
www.BlueRoseONE.com
info@bluerosepublishers.com
+91 8882 898 898
+4407342408967

ISBN: 978-93-7542-262-4

Cover design: Anuj
Typesetting: Tanya Raj Upadhyay

First Edition: February 2026

# Preface

As a criminal-side practicing advocate and a visiting professor of law, I have spent my life dissecting truth. I am trained to doubt, to probe, to interrogate reality itself. *Who? What? When? Where? Why?*—the relentless **WH** questions that strip lies bare.

I asked those questions of the man who came to me with this story.

He was not merely a narrator.
He was a press reporter.
And at the time… he was my client.

What he revealed was not superstition, rumor, or imagination. Every detail was cross-examined, challenged, and verified to the extent human reason allows. Yet some answers resisted logic. Some facts refused explanation. And some truths, once spoken aloud, began to feel dangerously alive.

This book is dedicated to that press reporter, and to my late father, **Mr. Ramdhan Nago Thate**, a school principal who taught me discipline and courage, and my late mother, **Mrs. Lalita Devi Ramdhan Thate**, who taught me empathy and restraint. Without them, I would not have had the strength to listen… or the wisdom to warn.

# अनुक्रमणिका


"मनात ती गोष्ट राहते"........................................................................ 1

स्वप्न खरी का?................................................................................ 10

जरांगे पाटील मोर्चा ......................................................................... 14

मोर्चा मुंबईचा ................................................................................ 21

सगळे दुकान बंद.............................................................................. 27

पुन्हा शाळा ................................................................................... 33

मिशन अखिलेश................................................................................ 39

घरच्या घरी (होम डेलीवरी) .............................................................. 42

कट्टी बट्टी ...................................................................................... 49

चला जिल्ह्याला .............................................................................. 54

शनिवारची रात्र................................................................................ 55

EMF मीटर चालू झाली आणि... ......................................................... 56

EMF मिटर आणि x रे ..................................................................... 71

इकडे हॉस्पिटल मध्ये ....................................................................... 85

स्वच्छ सकाळ ................................................................................. 99

# “मनात ती गोष्ट राहते”

१५ ऑगस्ट चा दिवस होता, त्या गावच्या शाळेत पोरांचा गडबडात चालू होता. अमित आणि त्याचे कुटुंब खूप खुश होते कारण त्याला त्याचा मोठा भावाप्रमाणे ‘शाळेचा सगळ्यात हुशार मुलगा’ म्हणून गौरवण्यात येणार होते, आणि त्यासाठी त्याचा भाऊ आकाश सुद्धा पुण्याहून आला होता. अमितला पुण्याचा खूप गोष्टी जाणून घ्याचंचा होता त्यामुळे त्या समारंभापेक्षा त्याला भावाशी गप्पा मारन्यात इंटरेस्ट होता.

कार्यक्रम सुरु झाला ....प्रथम मोरे बाईने ने आज च्या कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली, आणि सर्व पाहुण्याची ओळख आणी स्वागत केले. त्यानंतर मुख्यधापक सरांनी भाषण केले, नंतर ध्वज फडकून राष्ट्र्गान झाले. आणि प्रमुख पाहुण्याचे भाषण झाले आणि अमित ला स्टेज वर बोलवण्यात आले, सगळे मुले एकाच आवाजात .अमित!!! अमित!!! असे ओरडायला लागले. मोरे बाई ने सगळ्यांना शांत राहण्यास सांगितले. अमितला खूप आनद झाला होता कारण त्याचा भावाप्रमाणे त्यालासुद्धा .शाळेचा सगळ्यात हुशार मुलगा’

म्हणून गौरवण्यात आला अमित ला आता १०वी नंतर त्याला सुद्धा पुणे ला त्याच्या भावाप्रमाणे पुढेचे शिक्षण घ्यायला मिळेल.

कार्यकम संपला आणि सर्व मुले शाळेत खाऊ मिळतो त्यासाठी थांबले होते. अमित त्या खाऊ च्या ऐवजी शाळेत नविन काम्पुटर आणले होते ते वापरायचे होते त्या साठी तो लायब्ररी च्या सराना उस्मानसरना भेटला. उस्मान सर बोलले “ अरे अमित , आज तरी एन्जोय कर. तुला अवार्ड मिळला आहे’ अमित म्हणला , ‘सर भाऊ आलाय त्याला काही गोष्टी इंटरनेट वरून दाखवायचा आहेत प्लीज सर फक्त अर्धा तास कम्पुटर वापरायचा आहे.’

उस्मान सर म्हणाले ठीक आहे मी फक्त 30 मिनिट इंटरनेट ऑन करणार आहे त्यात तीस मिनिटांमध्ये तुम्हाला जे करायचं करा. हे ऐकून अमितला खूप आनंद झाला तो उड्या मारतच कम्प्युटर रूम मध्ये पळाला त्याच्या मागे मागे आकाश सुद्धा आला.

दोघांनी कॉम्पुटर चालू केला आणि ऑनलाईन मार्केटिंग वेबसाईट अमित ने चालू केली

हे बघून आकाश म्हणाला की, ‘तू असं ऑनलाईन मागणीसाठी जाऊ नकोस मग हे जर जातीलच पैसे तर जातीलच आणि इकडे लोक सुद्धा मार्केटिंगच्या नावाखाली फसवणारे असतात!अमित म्हणाला की ‘दादा मी काही गोष्टी मी विकणार नाहीये पण एक गोष्ट विकत घेणार आहे तुला तर माहित आहे आपल्या गावाचा जो पिन कोड आहे त्या पिन कोड वर काही गोष्टी डिलिव्हर होत नाही आता माझे म्हणणे असेच आहे की तू तुझ्या पुण्याच्या ऍड्रेसवर एक वस्तू मागव त्याचा मला काही गोष्टीची सायंटिफिक उपयोगात होणार आहे’

आकाश म्हणाला, ‘अरे बापरे आता काय शास्त्रज्ञ वगैरे होतो की काय?’

अमित मिळाला शास्त्रज्ञ नाही रे पण मला गौरव तिवारी सारखं भूत प्रेत मध्ये असतात कि नाही ते बघायचं आहे?

आकाश : म्हणाला , अरे अशा गोष्टींच्या मागे नको लागू काहीतरी करून बसशील आणि आई-वडिलांना त्रास होईल.’ तुला माहित आहे ना शेवटी गौरव तिवारी च काय झाल?

अमित : ‘अरे तू इंजिनियरचे शिक्षण घेतोस आणि भूतांना घाबरतोस ?

आकाश : ‘घाबरत नाही पण तुला आपल्या घरची परिस्थिती माहित आहे माझ्या शिक्षणामुळे आपलं शेत गहाण पडलेला आहे त्याच्यामुळे मी स्वतः एका लहानशा लायब्ररीमध्ये काम करून माझे पैसे मी कमावतो, तुझ्या अशा वेड्या- चाळयामुळे कोणाला काही नुकसान नको व्हायला’

अमितने समजावले की, ‘अरे दादा कोणाला काही होणार नाही ही !जिम्मेदारी माझी ठीक आहे?’

आकाश : ‘आता फक्त आपल्याकडे पंधरा मिनिटे आहेत पंधरा मिनिटात तू काय दाखवत होतास ते दाखव.’

अमितने एक वेबसाईट उघडली त्यामध्ये एक इलेक्ट्रॉनिक मीटर दाखवलं.

आकाश म्हणाला ‘अरे या मीटर बद्दल मला माहिती आहे ते मीटर फक्त आजूबाजूची एनर्जी ओळखत पण मला त्याच्यावर विश्वास नाही.’

अमितने विचारले, ‘तू ते वापरला आहेस का?’

आकाश म्हणाला, ‘वापरला नाहीये पण... मी त्याचे खूप सारे व्हिडिओज एका वेबसाईटवर बघितले’

अमित बोलला, ‘मला माहिती तू कुठली वेबसाईट बोलतोयस म्हणूनच मी ते मीटर मागवणार आहे आणि स्वतः त्याची टेस्ट करणार आहे’

इतक्यात उस्मान सर आले आणि त्या दोघांना म्हणाले,

‘अरे बाळांनो तुमच्याकडे फक्त पाच मिनिट आहेत मी आता इंटरनेट बंद करणार आहे पाच मिनिटात जे काय ते सांगा नंतर मला लॉक लावून वगैरे बाहेर जायचं आहे आणि तुम्ही पण शाळेमध्ये नाश्तापाणी करून जा’ दोघेही ‘हो सर म्हणाले’

अमितने आकाशला विनावनी केली , ‘दादा दादा प्लीज मला ते मीटर घेऊन दे ना प्लीज !!’

आकाश म्हणाला “ठीक आहे जर तू दहावी मध्ये ९० च्या वरती मार्ग काढलेस तर मी तुला तर मीटर आणून देतो.”

अमित खूप खुश झाला आणि त्याने वेबसाईट बंद केली.

मोरे बाई दिसल्या आणि म्हणाला की, “अरे तुम्ही दोघं इकडेच आहात? तुम्हाला काय नाश्तापाणी करायचं की नाही ?

दोघेपण म्हणाले “हो बाई आलोच..’’आणि असे म्हणून दोघांनी कॉम्प्युटर बंद केला

त्यानंतर दोघेपण नाश्त्यावर तुटून पडले तसेपण दोघांनी पण सकाळपासून काही खाल्ले नव्हते अगदी चहा सुद्धा नाही. फराळ खाल्ल्यानंतर हे दोघं घरी यायला निघाले इतक्या आता दोघांचा पण

मित्र निलेश रस्त्यात दिसला सायकलला धक्का मारत चालला होता आकाश आणि अमित या दोघांनी विचारले ‘अरे सायकल ला काय झालं?. निलेश म्हणाला “अरे काय माहित बेवड्याची झोपडीपाशी अचानक सायकलची चैन पडली आणि मग मी पण पडलो आता ढकलत चाललोय”

अमित म्हणाला काय बेवड्याच्या झोपडीपाशी? मी असं ऐकलं तिकडे एक भूत आहे?

आकाश वैतागून म्हणाला “हे काय तुमच भूत भूत चाललंय?

निलेश म्हणाला तुला पण कळला का? अमित आता भुतांचा सायंटिस्ट होणार आहे?

आकाश वैतागून बोलला हो आजच कळलं?

निलेश जोरजोरात हसायला लागला.

अमित दोघांवर चिडला आणि म्हणाला “मला आता दोघांची बोलायचं नाहीये मी जातो एकटा,”

निलेश आणि आकाश दोघेही त्याला “थांब थांब ” म्हणू लागले पण अमित ऐकायला तयार नव्हता गावात पळत घर गाठायच्या हिशोबात पळत होता.

घरी आल्यावर आईने अमितची दृष्ट काढली आणि त्याला ट्रॉफी मिळाली ती देव्हाऱ्यात ठेवली आणि देवाचे आभार मानायला लागली.

तेवढ्यात आकाश आणि निलेश दोघे सुद्धा घरात आले. आईने दोघांना पण प्यायला पाणी दिले व गुळ दिला.

आकाश बोलला "काय देवाचे थँक्यू म्हणतेस की काय?" आणि आई म्हणाली, "गप असं नाव नसते ठेवायचं!"

आकाश म्हणाला "ठीक आहे पण समजा उद्या तुझा मुलगा भूतावर विश्वास ठेवायला लागला तर काय म्हणशील ?

आई ओरडली "गप्प बस शहरात गेल्यापासून तुझं पण डोकं खूप चालतंय!"

आकाशने समजावले "अग तसं नाही तुला सांगतो..."

एवढ्यात अमित ने लांबून आकाशला 'हा जोडले आणि नको सांगू...' असा इशारा केला

आकाशने आईला समजावले की, 'जग एवढे पुढे चालले आणि तू अजून सुद्धा देवाला मानतेस?'

आई म्हणाली "हो आणि तू पण मानलाच पाहिजे!"

आकाश म्हणाला "ठीक आहे."

हळूहळू संध्याकाळ संध्याकाळ होत होती लांबूनच त्या बेवड्याची झोपडी दिसत होती, काट्याकुट्या कपडा उरलेले झोपडे आणि ती भयानक कोणाचीतरी सावली.

आकाश आणि अमित बाहेर कट्ट्यावर बसून दोघही शून्य नजरेत झोपडी आणि त्या झोपडीच्या पुढे असलेले मैदान यामध्ये उतरत्या सावलीच्या आणि संध्याकाळच्या हवेच्या भसूर अशा तालाने रहस्यमय शांततेत त एकमेकांशी काय बोलावे एक समजत नव्हते एवढ्यात आईचा आवाज आला "पोरांनो चहा घ्यायला" या दोघेपण आत मध्ये गेले. आता त्या शांततेत फक्त कप बशीचा आवाज येऊ

लागला तेवढ्यात आकाश म्हणाला "आई तुझ्या चहाची पुण्यामध्ये खूप आठवण येते आणि तुला माहिती आहे, एका मुलीने तिचा मोठा शिक्षण सोडून दिल्लीमध्ये चहाची टपरी काढली आहे आणि नागपूरला सुद्धा एक माणूस चहाची टपरी काढून एवढ्या फेमस झाला की त्याचा चहा प्यायला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष सुद्धा आले होते.' आई म्हणाली "हो का ? आता माझा चहा प्यायला अमेरिका वाला येणार आहे का नाही ना? मग तुम्हीच प्या आणि माझी आठवण काढा". अमितने विचारले , 'आई ही बेवड्याची झोपडी मध्ये काय आहे?' आईने विचारले, "अमित बाळ तुला अचानक मिळण्याचे झोपडी बद्दल काय आठवले?" अमित संगितले "आई दुपारी तो निलेश आला होता, तो म्हणाला जेव्हा तो घरी यायला निघाला तेव्हा त्याच्या सायकलची चैन आणि तो स्वतः अचानक सायकल वरून पडला ते पण बेवड्याच्या झोपडी जवळच !! म्हणून तुला विचारतोय." "अरे बापरे!" आईने डोक्याला हात लावतच खाली बसली "मग मी निलेशने उठल्यावर त्या ठिकाणी थुंकाला की नाही? आकाश म्हणाला "अग आई निलेश तंबाखू काय खातो काय त्याला विचारायला? आणि आई संगितले "तसं नसतं ...कोण अचानक पडलं तर जिथे पडला तिथे थुंकायचं असतं असं मोठे बोलून गेलेत? आणि "या सगळ्या अंधश्रद्धा आहेत" आकाश म्हणाला. "तू गप्प बस पुण्यात राहून राहून तुझा डोकं खराब झालाय!! मग आता आमच्या अडाणी लोकांना असंच म्हणणार." "अग तसं नाही प्रत्येक गोष्टीसाठी काहीतरी कारण असेल ना म्हणजे एखाद्या ठिकाणी आपण पडलो आणि आपण थुकलो तर त्याच्यामुळे काहीतरी कारण असेल ना? मी तुला मी तुला कारण विचारतोय? "हे बघ कारण वगैरे मला माहित नाही! पण असं करायचं असतं हे मी माझ्या लहानपणापासून ऐकते."

म्हणजे, “तुझ्याकडे पण कारण नाहीये असं म्हटलं तर चालेल? तुला काय म्हणायचं ते बघ. आणि चहा पिऊन झाला असेल तर गाईला वैरण दे”. आता जवळजवळ संध्याकाळी साडेसहा वाजले होते बारीक बारीक लाईट सुद्धा सगळ्या घरांच्या अंगणामध्ये लागल्या होत्या अमित आणि आकाश अजून सुद्धा त्या बेवड्याच्या तुटलेल्या झोपडीकडे बघत होते. आईने विचारले “काय रे काय काय दोघं बघताय?” आकाश म्हणाला. “काही नाही” बेवड्याच्या तुटलेल्या झोपडीकडे बघतोय. आणि आई म्हणाली “बस झाला जास्त बघू नका तिकडे गपचूप घरामध्ये या.” “अग आई तूच तर वैरण द्यायला सांगितलं” “हो पण त्या झोपडीकडे नव्हतं बघायला सांगितलं!! आता घरी चला शांतपणे.” आकाश आणि अमित घरात गेले. आणि आई काय तरी पुटपुंटली आणि घरात सुद्धा घरी गेली.

आता रात्रीचे ८ वाजले होते वडील सुद्धा आले होते, अमितला बक्षीस मिळाले बघून बघून ते पण आनंदात होते. अमित म्हणाला, “बाबा दहावीच्या परीक्षेत चांगले मार्क पडल्यानंतर मी सुद्धा पुण्याला जाईल चालेल? बाबांनी आईकडे बघितले आणि ती पीठ मिळत होती. ती सुद्धा एक क्षण गप्प राहिली कारण आता त्यांच्याकडे जमीन होती ती सुद्धा आकाशच्या शिक्षणासाठी खंडेरावाकडे गहाण होती. तरीसुद्धा मुलगा शिकतोय ते बघून वडील म्हणाले “हो. जा हो पुण्याला आणि मोठा इंजिनिअर बंद.” रात्रीचे जेवण झालं सगळे त्यांच्या अंथरुणावर पडले. वडील पडल्या पडल्यास घोर लागले होते. आकाश आणि अमित अजून जागी होते. अमितने विचारले “दादा पुण्याला आणि मित्र वगैरे कसे आहेत आणि काय करतात? मला सांगतोस का गमती जमती? आकाश म्हणाला, ‘हे बघ मी काय गमती जमती करायला पुण्याला जात नाही, माझा मी आणि काम आणि अभ्यास

करतो.आणि तू जर पुण्याला आलास तुला पण तेच करावे लागेल.' अमित थोडा हिरमुसला त्याचीही चुळबूळ चालत होती. आकाश ने विचारले "आता अजून काय विचार करतोयस." अमित म्हणाला "काही नाही त्या मीटर बद्दल विचार करतोय." आकाश म्हणाला "डोक्यातून काढून टाक जो पर्यन्त तुझा दहावीचा रिझल्ट चांगला येत नाही." "ठीक आहे" अमित म्हणाला.

# स्वप्न खरी का?

दुसऱ्या दिवशी आकाश पुण्याला जाणार होता त्यामुळे आणि लगबग चालू झाली. आकाश आईला म्हणाला, "मी शाळेतल्या शिक्षकांना भेटून येतो मग दुपारी पुण्याला जाईल." आई म्हणाली "हो लवकर कर तुझी गाडी वगैरे चुकायला नको." आकाश बोलला "हो अग! लवकर येतो."

आकाश शाळेत गेला त्याच्या सगळ्या आवडत्या शिक्षकांना भेटला. मग घरी आला. म्हणजे जेवण तयार होते, आणि त्याच्यासाठी, शिळा चपात्यांचे लाडू बनवले होते. ते त्याला फार आवडत. त्यांने रात्रीच जायची तयारी करून ठेवली त्याची बॅग वगैरे तयार होती.

इतक्यात अमित सुद्धा धावत आला, घरातल्यांनी विचारले "अरे काय झालं तुला शाळा नाही का?"

अमित म्हणाला, 'शाळा आहे पण हेडमास्तरांनी मलाच एकट्याला लवकर सोडलं.'

आईने विचारले तुलाच एकट्यालाच?..... का बरं?

अमित म्हणाला “अग दादा लवकर चाललाय ना... मग हेडमास्तर म्हणाले की दादाला गाडी मध्ये बसव, आणि मग घरी जा, म्हणून मी आलो.”

आकाशला संशय वाटला. पण तो काही बोलला नाही. आता बाबा आकाश आणि अमित तिघेजण गावच्या फाट्यावर जायला निघाले, अमित , आकाशच्या एकदम जवळ जवळ चिटकुनच, शेवटी आकाशनेच विचारले, तू जर त्या मीटर बद्दल विचारणार असेल तर, “मी तुला सांगितलं आहे की तुला ९० टक्क्यापेक्षा जास्त मार्ग मिळाले तर तुला मी मीटर घेऊन देणार, आता याच्यापुढे त्या मीटर च नाव आणि बेवड्याची झोपडी नाव नाही काढायचं.” अमितला गुदगुल्या झाल्या. इतक्यात पुणे ला जाणारी बस दिसले बाबा आणि अमित त्या बसला हात दाखवायला लागले बस थांबली, आकाश त्या बस मध्ये बसला बाबांच्या आणि आकाशच्या डोळ्यांमध्ये पाणी आले एकमेकांना काळजी घ्या असे म्हणत त्यांनी एकमेकांना निरोप दिला. अमित बस नाहीशी होईपर्यंत थांबला होता. बाबांनी अमितचे कांदे हलवले, आता घरी चल पोरा. असे म्हणून दोघेही घरच्या दिशेने जावू लागलं.

रस्त्यामध्ये घरी येताना-जाताना बेवड्याची झोपडी दिसली तेव्हा अमितने विचारले “बाबा या झोपडी बद्दल काय सांगू शकाल का?”

बाबा म्हणाले, “अरे ही बेवड्याची झोपडी तुला माहीत नाही का?”

अमित म्हणाला “ते माहिती आहे, पण बाबा, ते मी ओळखली काय म्हणतात, पण तस नाव एखद्या झोपडीला देण्यामध्ये साठी काहीतरी कारण असेल ना?”

कारण तर तर आहेच? बाबानी संगायाल सुरवात केली की, “या झोपडीत एक बेवडा गणू राहायचा, तो मला सुद्धा पैसे वगैरे मागत असे दारू प्यायला, मी पण कधी कधी देत असे त्याला काही रुपये देत असे. आपल्या गावचे बेवडे लोक आहेत ते त्यांना सगळे ओळखतात दारू पिऊन पिऊन किडनी खराब होऊन तो एके दिवशी म्हणजे रात्री मरण पावला. आपल्या गावचा जितेंद्र माहीत असेल तुला ?

अमित मनाला हो जितेंद्र नाना बरोबर?

“हो तोच तो. एक नंबरचा बेवडा. जेव्हा बेवडा गणू काका दिवशी वारला तेव्हा जितेंद्र नाना त्या झोपडी मध्ये खूप रडला होता. त्याने सगळे त्या बेवड्याचे जितेंद्र काकाने सगळे केले कारण गणू काका चे कुटुंब त्याला सोडून गेले”

अच्छा मग? अमित आता मन लावून ऐकत होता.

मग काय जितेंद्र नाना सुद्धा तेव्हापासून तिकडे जात पण नाही

अच्चा स्टोरी आहे का? अमित म्हणाला

“ हि स्टोरी नाही, मी पण होतो त्या दिवशी” हे खरे

बाबा तुम्हाला असं वाटतं की भूत वगैरे असतात? अमित ने घाबरत विचारले

“हे बघ अमित इकडे प्रकाश तिकडे काळोख, इकडे देव तिकडे दानव.” बाबाने समजवायाचा प्रयत्न केला

एवढा त्या दोघांनी बिवड्याची झोपडी ओलांडी सुद्धा. अमित त्या झोपडीकडे बघत होतो

“तिकडे उलटून नकोस बाबांनी सांगितले जवळजवळ ओरडले.” का? अमित ने विचारले. अरे अशा दृष्ट शक्ती आपल्या मागे मागे येतात.

“मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स असा अस्पष्ट असा आवाज आला.. अमितला.

“बाबा तुम्ही काय म्हणालात का” ? त्याने तुम्ही बाबांना विचारले

बाबा म्हणाले “काही नाही... चल लवकर घरी.”

तरीपण अमितला जाणवले की आपल्याला कोणाचा तरी आवाज आला.

अमितने बघितले मागे बघितले.

“मागे बघू नकोस” अमितचे बाबा जवळजवळ ओरडले.

अमित ने बाबांचे पकडले हात पकडले आणि तो भरभर चालू लागला

थोड्याच वेळात ते घरी पोहोचले अमितने आणि बाबांनी हात पाय धुतले इतक्यात अमित ची आई म्हणाली, 'अहो रामा भाऊने तुम्हाला पाटलांच्या वाड्यावर बोलावलं'

पाटलांच्या? का? तू विचारलं नाहीस?

मी कशाला विचारू? तुम्ही लवकर वाड्यावर जा आणि बघा.

अमित ने बाबांना विचारले बाबा मी पण येऊ? मला अण्णा पाटलांचा वाडा खूप आवडतो!

बाबा म्हणाले. 'चल!

आईने काही विचारले नाही.

# जरांगे पाटील मोर्चा

सदाशिव वाडा, हे नाव दगडी फिर्यांमध्ये जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी कोरले होते ते अजून सुद्धा तशीच्या तसे होते. सदाशिव पाटील हे आताचे अण्णा पाटील याचे आजोबा.

पाटील साहेब येऊ का आत?

'अरे.... रमेश ये !' अण्णा पाटलांचा दमदार आवाज हॉलमध्ये घुमत राहिला.

अमितने झोपाळ्यावर बसायची इच्छा प्रकट केली पण बाबांनी त्याला शांत राहायला सांगितले

इतक्यात अण्णा पाटील साहेब बाहेर आले आणि त्यांच्या सुनेने 'चहा कराय ना?' असे विचारले.

पाटलांनी काम होकाराथी मान हलवली आणि 'कसं चालू आहे? अमित शिक्षण कसं चालू आहे? अशी इथली तिथली चौकशी केली आणि रमेश ला एक प्रश्न विचारला.

रमेश हे बघ जरांगे पाटलांचा टीमचा निरोप आला आहे. मला वाटत कि, “आपल्या गावातून कमीत कमी ५० लोकं तरी मुंबईला त्यांच्या सभेसाठी गेली पाहिजे तर तू जाणार का?

जायचा तर आहे आहे पण......पाटील साहेब 'जरांगे दादांचा निरोप आहे म्हटल्यावर आम्ही सगळ्यांनी गेले पाहिजे पण आता पाऊस आहे आता पीक लावायची आहेत, मजदूर नाही आणि तुम्हाला तर माहित आहे की, आमची शेती आता गहाण आहे त्यामुळे मला जमणार नाही'

पाटील साहेब 'मी येऊ का? मोर्चाला? ' अमितने विचारले.

"अरे बाळ जर तुझ्या बाबांना आईला काय त्रास नसेल तर मी घेऊन जायला तयार आहे"

अण्णा पाटील साहेबांनी रमेशला (अमित च्या बाबा ) विचारला "रमेश तुला काय म्हणायचं"

रमेश म्हणाला, “तुमच्या सोबत गेला म्हणजे तुम्ही त्याची काळजी घेणारच यात काय प्रश्नच नाही”

अमितने विचारले ' पाटील साहेब जरा शाळेच्या गैरहजेरीच तेवढे बघा.'

पाटील हसत हसत म्हणाले, ' हो हो! ते मी बघतो'

अमित खुश झाला!

अमितने आणि त्याच्या बाबांनी पाटलांकडे चहा घेतला आणि दोघं पुन्हा घरी निघाले.

घरी पोहोचताच अमितच्या आईला अमितच्या बाबांनी सगळ्या प्रकार सांगितला ते ऐकून अमित ची आई संतापली आणि म्हणाली,

"तुम्हाला नाही म्हणाला सांगायला पाहिजे होतं. एवढंस पोरग माझ एक मुंबईला जाणार. काहीतरी विचार करायचा"

आणि अण्णा पाटलांसमोर कोण बोलते का?

आईने एक फटका अमितला मारला आणि म्हणाली "तुझ्या शाळेचं सुट्ट्या होतील त्याचं काय करायचं ?"

बाबांनी त्याच्याबद्दल सुद्धा आईला सांगितलं की "पाटील ते सगळं बघणार आहेत"

दुसऱ्या दिवशी शाळेमध्ये सुद्धा नोटीस आली की, 'ज्या मुलांना जरांगे पाटील यांच्या मोर्चामध्ये जायचं आहे त्यांनी त्यांचे नाव आणि पत्ता एका कागदावर घेऊन त्यामध्ये आई आणि वडील यांची संमती पत्र घेऊन हे शाळेमध्ये जमा करावे.' वर्षांमध्ये सामील झालेल्या मुलांना किंवा मुलींना गैरहजर दाखवणार नाहीत. हे ऐकून वर्गामध्ये एकच गलका झाला.

संध्याकाळी शाळा सुटल्यावर मुलांमध्ये कोण कोण जरांगे पाटील यांच्या मोर्चामध्ये जाणार जाणार आहे? याबद्दल चर्चा व्हायला लागल्या अमितने सांगितले "की हे मला कालच माहित पडलं त्यामुळे मी जाणार आहे. जसं मी आई-वडिलांना फक्त मी आता वडिलांची संमती पत्र येऊन उद्या येतो. तुझं काय रे चिन्या येणार का? चिन्या हा अमितचा चांगला दोस्त. तो त्याच्या वर्गात होता? त्याला पण यायचं होतं मुंबईला पण त्याच्या घरचे पाठवणार का? त्यामुळे तो संभ्रमात होता. तो म्हणाला 'अमित, मुंबईला मला यायचे आहे रे पण घरातले मला पाठवणार का नाही याबाबतीत मला घरी गेल्यावर सांगतो. अमित बोलला ठीक आहे? 'मला सगळं कालच समजल हो काल आम्ही संध्याकाळी सदाशिव वाड्यामध्ये गेलो होतो याबद्दल चर्चा

करायला'. अमितला सांगताना मस्त वाटलं होतं. "बरं आहे मला पण माझ्या घरातले पाठवतील अशी आपण प्रार्थना करूया."

दोघे मित्र वेगवेगळे झाले त्यांच्यावर घराकरिता जाण्यासाठी आणि अमित त्याच्या घरी जायला निघाला. दोन मिनिटात बेवड्याची झोपडी लागली. तेव्हा त्याचे पाय भरभर चालायला लागले त्याने मनातल्या मनात देवाचा नाव घेतलं, जशी बेवड्याची झोपडी लागली. त्याने हुशश...केला. तरी कानामध्ये आवाज आला, "मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स," हे ऐकून अमित जवळजवळ धावतच घरी निघाला. घरी पोहोचल्यावर तो दरवाजात दम खायला लागला. आणि आईने विचारले "काय रे कुत्रा वगैरे मागे लागला की काय??? अमित म्हणाला, 'माझ्या कानामध्ये कोणीतरी दारू मागत होता'. 'मागे बघितलं नाहीस ना?' आईने विचारले 'नाही डायरेक्ट घरातच कधी आलो' अमितने सांगितले आई म्हणाली ठीक आहे "हात पाय धु मी चहा करायला येते. आणि आता पुन्हा बेवड्याच्या झोपडीचं नाव काढायचं नाही समजलं? "हो." अमित म्हणाला.

रात्री अमितला झोप आली नाही तो बराच वेळ अंथरुनात बसला होता. या बाबा रात्री पाणी पिण्यासाठी उठले तेव्हा त्यांनी विचारले , 'अरे बाळ झोपला नाही?

आम्ही म्हणाला "नाही बाबा मला आज सुद्धा कानामध्ये हे शब्द ऐकायला आले? ते शब्द म्हणजे कुठले शब्द?

"मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स" असे

"अरे कालपासून तू त्या बेवड्याची झोपडी बाबत विचारत आहे त्यामुळे तुला जसा भास होत असेल. आता देवाचं नाव घे आणि झोपून घे कारण मुबईला कधी निघायचं? आता पंचयातीची सभेमध्ये ठरेल.

त्यासाठी उद्या ग्रामपंचायत मध्ये मीटिंग होणार आहे तुमच्या शाळेमध्ये सुद्धा नोटीस आली असेल." "हो नोटीस आली आणि सगळ्या पालकांचं एक लेटर सुद्धा घेऊन यायला सांगितली उद्या सकाळी मी लिहितो मी फक्त सही करा." "ठीक आहे". आता झोप. अमितला जरा बरं वाटलं दहा मिनिटातच झोपला."

दुसऱ्या दिवशी शाळा भरली. अमित 'कोण कोण मुंबईला येणार?' म्हणून उत्सुक होता. "कोणी कोणी पालकांचं लेटर आणलंय त्यांनी हात वर करा." पवार बाईने विचारले .

अमितच्या वर्गातून चौदा-पंधरा मुलं यायला तयार झाले. त्यात मुलीसुद्धा होत्या. चिन्या पण येणार म्हणून त्याने पण हात वरती केला अमितला जरा हायसं वाटलं की त्याच्यासोबत पंधरा लोक त्यांच्या गावातलेच आहेत. त्यानंतर फार पवार बाई म्हणाली की हे बघा "तुम्हाला जमतंय तेवढं खायला खायला घेऊन जा आपल्या गावातून सुद्धा भाकरी आणि चटणी आपली पंचायत देणार आहे कारण आज यांच्याकडे हे तुमचे पत्र देणार आहे आणि मुंबईला गेल्यावर तिकडे आपला ग्रुप सोडून जायचं नाही मस्ती करायची नाही. आपलं शाळेचं नाव खराब करायचं नाही. नेहमी सगळ्यांनी एकत्र राहायचं ठीक आहे." ठीक आहे मूले एका लयामध्ये मध्ये म्हणाले.

चिन्याने विचारले, 'अमित मला सांग तू मुंबईला का येतोस ? कारण काल माझ्या घरातले म्हणत होते, "तिकडे खूप गर्दी आहे आणि राहायला खूप त्रास होणार आहे, लहान मुलांनी जायला नको!!

अमित " अच्छ, हे तुला आहे तुला सगळं घरातल्यांनी सांगितलं

चिन्या "होतं!!!! तर"

अमित, “मग तू त्यांचं काय ऐक. का येतोस तू मुंबईला?

चिन्या : “अरे, तू पिक्चर मध्ये बघितलं नाहीस मुंबईला किती मोठ्या मोठ्या बिल्डिंग आहेत किती गाड्या आहेत मी भरपूर गमती जमती आहेत ते सगळं मला बघायचंय आणि पण तू नाही सांगितलं तुला मुंबईला का जायचं ते ?”

अमित : “हे बघ मी उंच बिल्डिंग आणि गाड्या पुण्यालाच बघितले जेव्हा आकाश दादाला पाहिल्यानंदा सोडायला गेलो होतो तेव्हा त्यामुळे त्या गोष्टीच आकर्षण मला नाहीये मला एक विशिष्ट गोष्ट विकत घ्यायची त्यासाठी मी चालले मुंबईला आणि जरंगे पाटील दादा पण तिकडे येत आहेत तिकडे जवळच ते दुकान आहे इलेक्ट्रॉनिक्सच म्हणून मी चालले मुंबईला”

चिन्या “इलेक्ट्रॉनिक्स दुकान हे तर आपल्या सदुभाऊ कडे पण मिळेल की? तिकडे सगळे बल्ब ट्यूबलाईट आणि वायर वगैरे भेटताच”

अमित : “अरे वेड्या ते नाही काही मॅग्नेटिक फिल्ड EMF डिटेक्टर म्हणतात त्याला विचारलं ते आपल्याकडे मिळत नाही ते मुंबईलाच मिळतं मी पण इंटरनेटवरून शोधलं तर ते दुकान आणि जरांगे पाटील दादांचं आंदोलन जवळच आहे बघूया आता काय होते”

चिन्या : आच्या तर ही अशी गंमत आहे का पण ते तुझं मीटर काय करत?

अमित : “ते मीटर आहे ना ते आपल्याला दाखवतो की आपल्या आजूबाजूला प्रेत किंवा भूत प्रेत आहे की नाही?

चिन्या : अरे बापरे आणि ते तू कुठे बघणार?

**अमित : त्या बेवड्याच्या झोपडी जवळ जाताना. कारण तिथून गेल्यावर मला आवाज येतो मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स**

**चिन्या : पण “तिकडे कोण जात नाही ना मग तू कसा जाणार?**

**अमित : अरे ते मीटर आहे ना? दहा पंधरा मीटरच्या मध्ये जे जे निगेटिव्ह व्हायब्रेशन असतात ते दाखवतात त्याच्यामुळे बेवड्याच्या झोपडीच्या जवळ जायचं काय कारणच नाही आपण जसं बाहेरून जातो ना तसं जायचं आणि हे मीटर EMF मिटर चेक करायचं झालं काम!!!**

**चिन्या : “हा मग हे ठीक आहे म्हणजे बेवड्याच्या झोपडी जवळ जायचं काम नाही ठीक आहे मी पण येतो तुझ्यासोबत टाईमपास. माझा मामा येणार आहे. तो तिकडे मुंबईलाच राहतो.**

**अमित : अरे तुझा मामा असेल ना सोबत मग घरातले नक्की पाठवतील !**

**चिन्या : मामा फक्त मुंबई पर्यंतच आहे त्यानंतर तो त्याच्या सासरवाडीला जाणार आहे, त्यामुळे येतांना मी एकटाच आहे.**

**अमित : अरे, पाठवतील विचार करू नकोस. आणि घरी त्या मीटरबद्दल काही सांग नकोस कारण कारण ना त्या मीटर बद्दल फक्त तुला आणि आकाश दादाला माहित आहे**

# मोर्चा मुंबईचा

मुंबईला जायचा दिवस जवळ आला त्यामुळे अमित फार आनंदी होता. अमितच्या गावावरून दोन छोटे ट्रक मुंबईला जाणार होते एका ट्रकमध्ये शाळेतले मुलं आणि दुसऱ्या ट्रक मध्ये मुली आणि म्हातारी माणसं अशी बसणार होती अमित आणि चिन्या दोघं जवळजवळ बसले एवढ्यात जोरदार पाऊस सुरू झाला. मंगेश दादाकडे- चिन्या चा मामाकडे इंटरनेट असणारा मोबाईल होता त्यामध्ये तो पावसाच्या बातम्या बघत होता. चिन्याने विचारले मंगेश दादा किती दिवस पाऊस असणार? मंगेश दादांनी ऐकून न ऐकल्यासारखे केले. त्यामुळे अमित वैतागला, चिन्हाला गप्प राहायला सांगितले.

अमित म्हणाला 'अरे पाऊस पावसाचे दिवस आहेत असणार तो तर काम करणार. आपण आपलं काम करायचं.'

'असं नाही रे आपल्याला माहित असेल ना की किती पर्यंत पाऊस आहे?'

'समजा पाऊस मुंबई पर्यंत असता तर काय करणार रिटर्न घरी येणार आहेस का? नाही ना गप!" बस

हे ऐकल्यावर चिन्या गप्प बसला

जेव्हा ट्रक मेन हायवेला लागले तेव्हा अधे मध्ये मध्ये जरांगे दादा की जय अशी आरोळी यायची. शाळेतली सगळी मुलं तेव्हा जय म्हणून मोठ्याने कल्ला करायचे.

जेव्हा घाट रस्ता लागला तेव्हा चिन्याचा मामा मंगेश दादांनी म्हणाला की, "इथे भातण बोगदा आहे, तिकडे मराठी अभिनेत्री भक्ती बर्वे यांचा एक्सीडेंट झाला होता असे म्हणतात की अजून सुद्धा भक्ती ताई काही लोकांना मध्ये दिसते"

हे ऐकून अमितला थोडं विचित्र वाटलं, तो मामाला म्हणाला की, अरे मामा तू मुंबईत राहतोस तुझ्या अशा गोष्टींवर विश्वास आहे?

विश्वास नसला काय झालं? काय गोष्टी आपल्या हातात नसतात. काही गोष्टींना तर्क नसतात पण काही गोष्टी मानायला लागतात

बोगदा लागला होता, चिन्याचे आणि अमितचे डोळे रस्त्याच्या कडेला लागून होते.

काय मिनिटातच बोगदा संपला आणि दोन्ही ट्रक रस्त्याच्या बाजूला उभे राहिले. अमित आणि चिन्या एकमेकांकडे बघू लागलो. की गाडी का थांबली म्हणून? इतक्यात सरपंचाच्या माणसाचा आवाज आला "आता आपण सगळे खाऊन पिऊन घेणार आहोत मग आपण पुन्हा गाडीमध्ये बसून जाणार आता सगळ्यांनी खाली उतरा." सगळे खाली उतरले अमित जरा पुढे जाऊन सरपंचनाला 'मला भूक नाही मी त्यामुळे मी गाडीत झोपू का' सरपंच म्हणाले 'ठीक आहे झोप'

अमितचा डोळा लागणार होता इतक्यात टेम्पो सुरू झाला आणि सगळेजण बसायला लागले त्यामुळे अमित उठला.

पुन्हा एकदा 'जरांगे पाटील की जय' असा आवाज घुमला आणि दोन्ही टेम्पो मुंबईच्या दिशेने जायला लागले

मंगेश दादा अमितच्या बाजूला झोपलेला त्यामुळे अमितने हळूच मी विचारले मंगेश मामा तुझा मोबाईल देतोस का? मामांनी हळूच असले आणि विचारले "काय रे रात्रीचा मोबाईल नक्की काय बघायचे मोबाईल? असं म्हणत त्याने मोबाईल दिला आणि म्हणाला 'तुम्ही खूप मोठे झाले आहात' आणि कोपरा अमित वर घासला. त्यावर अमित म्हणाला 'अरे मामा तसं काही नाही मला एक पत्ता हवा होता मुंबईचा म्हणून मी शोधत होतो इंटरनेटवर'. मंगेश दादांनी विचारले कुठला पत्ता मला पण सांग ? अमित म्हणाला "सीएसटी इथली कॅमेरा गल्ली..." अरे बस एवढंच? मंगेश दादा म्हणाला. म्हणाली "माहिती आहे त्या गल्लीमध्ये सगळ्या प्रकारच्या कॅमेरे मिळतात व कॅमेरा सोबत विविध प्रकारचे आणि बॅटऱ्या पण मिळतात. तुला काय तिकडे कॅमेरा घ्यायचा आहे का तिकडे सेकंड हॅन्ड कमेरे पण मिळतात." आकाश संकोचला पण त्याने सगळं सांगितलं की त्याला कुठल्या प्रकारची उपकरण हवे आहेत. आणि आणि त्याच्याकडून वचन घेतलं की तो कोणाला सांगणार नाही. मंगेश दादा बोलला की कोणाला सांगणार नाही पण तू ते मीटर घेऊ नकोस अशा गोष्टी असतात त्याला उगाच छेड काढायची नसते. व मला माहिती आहे तू जेव्हा त्या बोगद्याबद्दल सांगत होतास तेव्हा मी ओळखलं की तू कसा आहेस की अजून विश्वास ठेवतोस. मग अमितने बेवड्याच्या झोपडी बद्दल त्याला सगळं सांगितलं की त्याला त्याचा शेता जवळ श्यस्स्स्सस्स्स्स श्यस्स्स्सस्स्स्स असा दोनदा त्याला आवाज आला. मंगेश दादा म्हणाला, "हे बघ असे किडे करू नकोस तू हुशार मुलगा आहेस चांगला शिक आणि आई-वडिलांना सुख दे." तरी सुद्धा मंगेश

मामाने अमितला मोबाईल दिला. अमित ने तो पत्ता बघितला आणि त्या पत्त्या पासून जरांगे पाटील यांची सभा किती लांब आहे याचं अंतर सुद्धा बघितलं त्यांनी स्क्रीन शॉट काढला आणि झोपला. पहाटे चार-पाच वाजता अमित उठला कारण आता जरांगे दादाची मोर्चा किती मोठा आहे ते दिसत होती कारण खूप वेळ पासून त्यांचे टेम्पो थांबले होते.

चिनू पण उठला कारण त्याला पण 'सु' करायची होती त्याने मंगेश दादाला उठवलं आम्ही तुम्हाला सार्वजनिक स्वच्छता इकडे नेत आहोत, सकाळचे कार्यक्रम तिथे आटपा, आंघोळ करा आणि मग आपण सगळे जरांगे दादांना भेटायला जाऊ. रात्री मंगेश दादाला मोबाईल अमितने दिला नाही तो अमित कडेच होता त्यामुळे अमितने त्याचं आणि कॅमेरा गल्लीतलं लोकेशन आणि डिस्टन्स चेक केले हे फार जवळ होतं मग आम्ही त्याने दादाला सांगितला दादा, आपण फार जवळ आहोत! कोणाच्या? दादानी विचारलं.. अरे दादा का रात्री नाही का? हो हो हो! मी म्हणालो ना मला माहित आहे. हो तरी सुद्धा मी चेक केला आणि लोकेशन वगैरे स्क्रीन शॉट काढून ठेवला. आत्ता आपण जेथे जाणार आहोत सार्वजनिक स्वच्छता किंवा सुलभ स्वच्छता तिकडून बाहेर पडल्यानंतर सरळ रस्ता पकडायचा त्या रस्त्यावर कॅमेरा गल्ली आहे! अमित फार एक्साईट झाला होता पण सगळ्या मराठा समाजाच्या गाड्या फ्री वे वर अडकून होत्या कारण पोलीस पुढे जाऊ देत नव्हते. मंगेश दादा म्हणाला मी पाटलांशी बोलतो आणि बघतो कसं जायचं ते कारण मला माहिती सगळ्या रस्ता. अमित आणि चिन्या खूप खुश होते कारण मंगेश दादा सोबत होता. पुढे गावच्या पाटला सोबत माझे दादा काहीतरी बोलला मग गावच्या पाटलांनी त्याच्या गडना काहीतरी सांगितले. त्या गड्यांनी त्यांचा निरोप दोन्ही टेम्पो

वाल्यांना दिला होता. ते ऐकून सगळ्या टेम्पो खाली झाला आणि मंगेश दादा आणि पाटील पुढे पुढे जावू लागले त्यांच्या मागे सगळे लोक यायला लागले

पोलिसांनी सगळ्या गाड्या अडवल्या होत्या. अमित चिन्याला म्हणाला बरं झालं आपण चालत निघालो आपण लवकर तरी पोहोचू.

चिन्या म्हणाला गप्प बस इकडे मला सु-सु लागले फार जोरात काय करू?

आपण लहान मुले आहोत इकडेच धार मार. फक्त शाळेतल्या पोरींना पुढे जाऊ दे.

शेवटी चिन्याने मंगेश दादाला सांगितले की त्याला फक्त धार मारायची आहे काय तरी प्रबंध घर.

मंगेश दादा मनाला अरे तू कुठल्या पण मोठ्या टेम्पोच्या मागे जा आणि खाली होऊन ये आणि हो आपला बॅनर लक्षात ठेव आम्ही हळूहळू पुढे झालो.

चिन्या लगेच समोरच्या मोठ्या टेम्पोच्या मागे जाऊन हलका झाला. व लगेच मंगेश दादाला आणि पाटलाला जॉईन झाला. दहा मिनिटात त्यांच्या गावची सगळी लोकं सीएससी स्टेशनमध्ये एकमेकांना भेटली. आंघोळी केल्या कपडे बदलले आणि जरांगे पाटील यांना भेटायला निघाले.

अमित मंगेश दादा म्हणाला दादा हे सीएसटी स्टेशन इकडून दहा मिनिटानंतर कॅमेराचे दुकान आहे ते मला दाखवशील? मंगेश दादा हो म्हणाला.

**दहा मिनिटानंतर सगळे आझाद मैदानाच्या दिशेने आले तिकडून कॅमेरा गल्ली जवळच होती आजच्या आले. मग हे दादा म्हणाला हे बघ इथून समोरच कॅमेरा गल्ली आहे आपण जरांगे दादांना भेटू आणि मग जाऊ. अमित म्हणाला ओके**

# सगळे दुकान बंद

जरांगे पाटील यांचा मोर्चा मुंबईला येणार त्यामुळे दुकानाची नुकसान होऊ नये त्यासाठी सगळ्या दुकानदारांनी त्यांचे दुकान बंद ठेवले होते. अगदी पाण्याचे दुकान सुद्धा बंद होते लोकांना पाणी पण मिळत नव्हते. त्यामुळे अमितला फार वाईट वाटले की लोकांना पाणी पण मिळत नाही मला माझं मीटर कसा मिळणार दिसायला तरी पाहिजे? अमित मनोमन देवाची प्रार्थना करत होता कि त्याला मिटरच दुकान मिळाव. पण जेव्हा मंगेश दादा सोबत आम्ही कॅमेरा गल्लीमध्ये पोहोचला किंवा कॅमेरा कधी सुद्धा बंद होते. त्याने लोकांना विचारले ही गल्ली कब चालू होगी? लोक म्हणाले. हमे मालूम नही, शायद तब तक नही जब मोर्चा बंद नाही होता. अमित अजून हिरमुसला. मंगेश दादा म्हणाला हे बघा मी देवाला सुद्धा तू ते मशीन घेऊ नये असं वाटतं तू गप्प गावाला जा आणि आता अभ्यास कर तुझा भाऊ तुला ९० टक्के मिळाल्यावर नाहीतरी दादा ते मीटर आणून देणार आहे. दादा तू सुद्धा देवावर विषयावर ठेवतोस? अमितने विचारले, अरे तू जर भुतांवर विश्वास ठेवतोस तर मी तर देवांवर विश्वास ठेवणारच कि नाही. अरे मी त्या निगेटिव्ह एनर्जी वर विश्वास ठेवायचा की नाही यासाठी मीटर

शोधतोय आणि तू तर देव वगैरे गोष्टीवर विश्वासराव लागल्यास? ठीक आहे मंगेश दादा दादा म्हणाला, 'मग असं समज की मी पॉझिटिव्ह विश्वास ठेवतो. आता गप्प बस.' ठीक आहे! दादा, "मोबाईल कॅमेरा मोबाईल मधून या दुकानाचा फोटो काढला आणि तिथे लिहिलेला फोन नंबर चा फोटो काढच काढ." "ते मी करू शकतो आणि मंगेश दादांनी फोटो काढला व ते दोघं पुन्हा मोर्चामध्ये घुसून मिसळून गेले." दुपार आता संपणार होती त्यामुळे सगळ्यांना भूक लागली होती, त्यांच्या गावची लोकं आता पुन्हा त्यांच्या टेम्पोकडे निघाले. अमित शून्यात बघत होता. एवढ्यात मागून चिन्या आला, त्याने अमितला विचारले, आणि अरे तुम्ही कुठे गेले होतात? आपल्या गावच्या पाटलांकडे एका चॅनल वाले आले होते. त्यांनी त्यांचा एक-दोन मिनिटा चा इंटरव्यू घेतला. आणि त्याला बाईट म्हणतात रे - मंगेश दादा ने सांगितले. होते पण तुम्ही कुठे होतात? मंगेश दादाने अमित कडे कडे बघितले, "अमितनेच सांगितले की आम्ही मुंबईच्या कॅमेरा गल्लीमध्ये जरा फेरफटका मारून आलं पण सगळं बंद होतं त्यामुळे परत आलो तर आता बघितलं तर सगळे सगळीकडे लोक परत निघतात. काय रे काय झालं?" अरे काही नाही सगळ्यांना भुका लागले. म्हणून आम्ही टेम्पोवर निघालोय तसं पण पोलिसांनी लावूड स्पीकरवर सांगितले की, रस्त्यांवर उभे असलेल्या गाड्या काढून घ्या. "ठीक आहे चला जाऊया." टेम्पो मध्ये आल्या आल्या अमितने मंगेश दादाच्या मोबाईल मधून त्या कॅमेराच्या पत्ता त्याच्या डायरीमध्ये देऊन घेतला त्यानंतर ती सगळी जेवली जायला लागले. टेम्पो च्या ठिकाणी गेल्यानंतर मंगेश दादा म्हणाला, "की मी आता जात आहे तुम्ही लोक एकमेकांची काळजी घ्या आणि घरी गेल्यावर मला फोन करा ठीक आहे.ओके.? " असे म्हणून जवळच असलेल्या असलेल्या एका बस

मध्ये बसला आणि निघाला. अमित अजून तोंड पाडून बसला होता. अरे चिन्या काय झाले? अमितने विचारले. काही नाही? अमित गप्प बसला. इतक्यात त्याला मोर्चातून आलेली लोक जल्लोष करताना दिसले जिंकलं रे जिंकलो!!! अमितला अजून समजेना काय करायचं. गावचे पाटील म्हणाले, यांना म्हणतात "पाटील." सरकारने पाय मागे घेतला की नाही? आपल्या मागण्या मान्य झाल्या. आता सगळ्यांना घरी जायला सांगितले जरांगे साहेबांनी. सगळे जण रस्त्यात गाडीमध्ये बसून बोलू. चिन्याला पण काय चाललंय ते कळेना. मग त्यांनी त्यांच्या सरांना विचारले. सर म्हणाले "जरांगे दादांचा उपोषण संपला आहे कारण सरकारनी त्यांच्या मागण्या मान्य केले आहे." आजच्या आज असे का ? लगेच आपण घरी जायचं मग आता उपोषण संपलं? अमितने विचारले !! आता उगाच रस्ता थांबवुन उगाच मुंबईला कामावर येणारा लोकांना अडवायची गरज नाही! आणि जरांगे दादांनी सांगितलं सगळ्यांनी घरी जा. तुला थांबायचं होतं का? तसं नाही एक दिवस थांबून मुंबई बघून निघालो असतो? अच्छा म्हणजे तू मुंबई बघायला यासाठी आलेला. सर म्हणाले. "तसं नाही सर....पण आता एवढ्या लांब आल्यावर तर मुंबई बघितली असती. "बच्चू आता तुझं दहावीचे वर्ष आहे एका महिन्याने तुझी शाळा संपेल त्यानंतर तू परीक्षेला बस... मग जून जुलै तिथे जायचे तिकडे जा रिझल्ट आल्यावर. "हो सर" अमित म्हणाला. आणि ते सगळे लोक त्यांच्या टेम्पोकडे निघाले. सगळे टेम्पोमध्ये बसल्यावर पाठीमागे सगळ्यांची हजेरी घेतली म्हणजे कोण मागे राहायला नको. मुलांच्या टेम्पोमध्ये सरांनी मुलांची हजेरी घेतली मुलींच्या टेम्पोमध्ये बाईंनी यांनी हजेरी घेतली. सगळे लोक बरोबर होते तेव्हा अण्णा पाटलांनी त्यांच्या गाड्या पुन्हा गावाला हलवल्या.

संध्याकाळ होत होती, रिमझिम पाऊस पडत होता. इतक्यात ब्लॅक अँड व्हाईट मोबाईलवर मंगेश दादाचा फोन अमितला आला. “काय मग अमित निघालास का?” “हो मामा.” चीन्या सोबतच आहे ना. व माझ्या बाजूला बसलाय देऊ का फोन त्याला? “दे की.” “चिन्या आणि मामा काय तरी बोलले की? अमितने फोन ठेवला मग चिन्याला विचारले. “घरचाचा फोन इकडे घेऊन आलास? घेताना वडिलांना विचारलं का? अरे फोन त्यांनी दिला... तिकडे जाऊन हरवू नये म्हणून. मी घेऊन आलो.” “मंगेश दादाला माहित आहे का. हो रे आणि माहीत असल्याशिवाय काय त्याचा फोन येणार का? ? “अरे हो मी रे विसरलो!” ते पण बरोबर! ठीक आहे. चल माझी पाठ आणि हाड दुखतंय जर आम्ही पडतो. व माझे पण पाय दुखतात मी पण पडतो. दोघेही एकमेकांना बोलत आडवे झाले. दोघेजण थकले, त्यामुळे त्यांना लगेच झोप आली. शेवटी दोन तीन तासांनी ते उठले तेव्हा त्याने बघितले की त्यांचा टेम्पो आता पनवेलच्या रस्त्याने चालला आहे. मग दोघे उठले. पाटलांना विचारले ‘अण्णा पाटील आम्हाला लघवीला जायचं आहे. हो मला पण जायचं आहे मी समोरच्या टेम्पोला सांगतो. कुठल्यातरी पेट्रोल पंप थांबायला, आता आपल्याला डिझेल पण टाकायचा आहे पाटील म्हणले . अण्णा पाटलाने त्यांच्या पुढे असलेल्या टेम्पोला टेम्पोच्या ड्रायव्हर सोबत फोनवर बोलले की गाडी चा डिझेल संपत आल असेल आहे आता पुढच्या पेट्रोल संपला दोन्ही गाड्यामध्ये डिझेल भरुया. जे पेट्रोल पंप दिसेल ते थांब. दहा पंधरा मिनिटात दोन्ही टेम्पो थांबले, चांगले मोठे पेट्रोल पंप होते, शाळेच्या सरांनी व बाईंनी सांगितले की ज्यांना बाथरूमला ला जायचंय त्यांनी जाऊन या आता पुढे कधी आपण थांबणार याची काय गॅरंटी नाही.

सगळे टेम्पोमध्ये बसल्यावर पाठीमागे सगळ्यांची हजेरी घेऊन जाऊया म्हणजे म्हणजे कोण मागे राहायला नको. टेम्पो मध्ये डिझेल टाकले, दोन्ही बाई मास्तरांनी सगळ्यांची हजेरी घेतली पुन्हा एकदा सगळे आले की नाही हे विचारले. आणि अण्णा पाटील यांना सांगितले आता आपण निघूया. मग अण्णा पाटील यांनी पुन्हा एकदा त्यांच्या भरदार आवाजात चौकशी केली की "सगळे आले का पोरांनो?" सगळेजण एका आवाजात बोलले हो सगळे आलो!!. त्यानंतर सगळे त्यांच्या त्यांच्यामध्ये टेम्पोमध्ये बसले, आणि टेम्पो त्यांच्या गावाकडे निघाले.

अमित आणि चिन्या बाजूलाच बसले होते. पण दोघेही बोलत नव्हते. बिचारे शांत बसलेले, आता गाडी मुंबई पुणे एक्सप्रेस रोडला लागली होती. अगदी शांतपणे टेम्पो चालला होता. मध्ये मध्ये जरांगे पाटलांचा मोर्चा असलेले गाड्या येत होत्या. त्याच्याकडे हुरूप होता जसे अण्णा पाटलांची गाडी जायची तसं पुन्हा एकदा जवळच्या गाडीचे लोक, मुंबई जिंकलो रे मुंबई जिंकलो रे! चा नारा देत होते! अमित आणि चिन्या यांना पण असे ओरडायचे झाली पण ते दोघे खूप थकलेले होते आणि त्यांच्यासोबत असलेले इतर सवंगडी सुद्धा. दोन्ही टेम्पो रात्री जेवणासाठी थांबले नतर निघाले . आता घरी गेल्यावर काय करणार? चिन्या विचारले? हा काय प्रश्न आहे अभ्यास करणार? तुझं पण दहावीच वर्षे आहे विसरलास? खि खी खी करत चिन्याने प्रश्न हसणेवारी नेला. "ठीक आहे ते जाऊ दे तू मगाशी तुझ्या वहीमध्ये काय लिहितो तर दाखव? काही नाही मुंबईच्या एका दुकानाचे पत्ता लिहून घेत होतो! कुठला दुकान आणि कसला पत्ता? अरे मला जे मीटर पाहिजे होतं ना ते? च्या दुकानाचा पत्ता. अच्छा पण ते तू ऑनलाईन पण मागू शकतोस ना? चिन्याने विचारले "अरे हो खरं आहे. पण

माझ्याकडे इंटरनेट वाला मोबाइल नाही. आणि वरून आपलं गाव खेडेगाव तिकडे डिलिव्हरी दिले की नाही मला माहित नाही.” “हे पण खर आहे.” चिन्या पुटपुटला.

# पुन्हा शाळा

पहाटे सगळे गावी पोहोचले, गावच्या फाट्यावर वरच टेम्पो थांबले मग अण्णा पाटील बाहेर आले आणि त्यांनी विचारलं कोणाकोणाला खालच्या गावात जायचंय? काही मुलं आणि मुली खाली उतरले कारण त्यांना वरच्या गावात जायचं होतं आणि बाकी सगळे बसून होते कारण त्यांना खालच्या जायचं होतं. अमित सुद्धा बसून होता त्याला कारण त्याला मागे उतरायचं होतं. त्यांनी अण्णा पाटलांना सांगितलं पाटील "मला माझ्या घराच्या जवळ वेशी जवळ सोडणार का?". आणि अण्णा पाटील म्हणाले "ठीक आहे." मग दोन्ही टेम्पो पुन्हा चालू झाले. मग शाळा गेली त्यानंतर बेवड्याची झोपडी गेली नंतर लगेच अमितचं घर आलं. उद्या शाळेत भेटू असे म्हणत अमित ने सगळ्यांना नमस्कार केला आणि खाली उतरला. चिन्यासुद्धा अमितला बोलला चल उद्या भेटू, मला तुझा एक गंमत सांगायची आहे. मग दुपारी ये ना माझ्या घरी आपण बोलू. आई आई नाही पाठवणार उद्या शाळेमध्ये भेटू. टेम्पो चालू झाला होता. अमित म्हणाला "ठीक आहे उद्या भेटू." आणि टेम्पो खालच्या गावात जाईपर्यंत अमित बघत होता. अमित ची आई बाबा दोघं घरीच होते.

अमित आल्यामुळे त्या दोघांना खूप आनंद झाला. अमितच्या आईने अमितची नजर काढली. अमित मुंबईतली गंमती-जमती सांगत होता तोपर्यंत आईने चहा आणला. मग बाबांनी, “मुंबई कशी आहे?” असं विचारलं. तेव्हा अमितने म्हणाला मला काही माहित नाही “तिकडे काही बघायला भेटले नाही. सगळे दुकान बंद होते. रस्त्यावर सगळे कार्यकर्ते वगैरे होते आणि पोलीस होते. त्यामुळे पुढे जायला भेटला नाही आहे.” त्या दिवशी संपुर्ण दुपार अमितने लोळून काढली. संध्याकाळ होत होती बाबा पण घरीच होते.

दुसऱ्या दिवशी अण्णा पाटील अमितच्या घरी आले. त्यांनी त्यांच्या भरदार आवाजात विचारले अमित आहे का घरी? अमित ने सुद्धा वरून पटकन उडी मारून बाहेर गेला आणि घरी म्हणाला, “अग आई अहो बाबा .... पाटील साहेब आलेत.” आई आणि बाबा बाहेर आले आणि म्हणाले. “या या पाटील अमितचा गाडीमध्ये काय मस्ती केली नाही ना? “नाही नाही व्यवस्थित आला मस्त राहिला मग लगेच दुसऱ्या दिवशी लगेच आंदोलन जिंकलो आपण म्हणून लवकर निघालो.” “आंदोलन जिंकणारच होतो आपण !! बाबा म्हणाले. जरांगे पाटलामध्ये भरपूर दम आहे.” “ते तर आहेच की.” अण्णा पाटील म्हणाले. “तुम्हाला आंदोलनाबाबत थोडं कळलं असेल ना. अहो थोडा म्हणजे काय सगळं आम्हाला आपल्या धाकल्या पाटलांनी टीव्हीवर दाखवलं म्हणून सगळं कळल.” “अग आई अण्णा पाटलांचा सुद्धा इंटरविव झाला पण कुठल्या tv चा होता ते माहित नाही.” “अरे वा अमित तुला जर माहित आहे तर!! हो पाटील आमच्या समोरच त्यांनी माईक तुमच्यासमोर आणला आणि अजून विचारलं माहित नसेल तर काय झालं.” “अण्णा पाटलांची कॉलर जरा जास्त टाईट झाली. एवढ्यात चहा आला. “वहिनी यांची काय गरज होती?” अण्णा

पाटलांनी चहा तोंडानी नाकारला. “पाटलांचे पाय आमच्या घरी लागले एवढे करायच.” पाटील अजून खुश झाले. पाटलांनी चहा घेतला आणि अमितच्या बाबांने सुद्धा. अमितच्या बाबांनी आणि पाटलानच्या राजकारणाविषयी गप्पा सुरू झाल्या आणि शेवटी संध्याकाळचे आठ वाजले कळलं पण नाही. पाटील घरी जायला निघाले. “पाटील साहेब आता जेऊनच जा की ! अमितची आई आग्रह करू लागली पण पाटील बोलले की. “दोन-तीन दिवसात जिल्हाच्या ऑफिसला जायचं आहे उद्या तेवढीच मिटिंग आहे त्यामुळे आज नको आग्रह करून पुन्हा कधीतरी.” एवढ्या पाटील बाहेर गेले सुद्धा आणि चपला घातल्या सुद्धा. अमितच्या बाबांनी हातात कंदील घेतला आणि घरी सांगितले की मी पाटील साहेबांना सोडून येतो. ठीक आहे? “पोरगा फारच चनचणीत आणि हुशार आहे म्हणजेच काय मदत लागली तर मला निसंकोच विचारा.” “हो पाटील साहेब नक्की नक्की त्याला सुद्धा त्याच्या भावा प्रमाणे इंजिनियर व्हायचे.” आता आमच्याकडे जमीन पण नाही गहाण ठेवायला. “नको असू दे तुमचा अण्णा पाटील आहे की. अमितला जिथे जायचंय तिथे जाऊ द्या मी त्याचा सगळा खर्च करीन. खूप हुशार आहे तो.” अमितचे बाबा पाटलांचे पाय पकडू लाकले. “अरे असं काय करतोस तू माझा छोटा भाऊ आहे आणि अमित पण माझ्या मुलासारखे काळजी करू नकोस.” “फार फार उपकार साहेब.” असे म्हणत असे म्हणत पाटलांचा वाडा आला सुद्धा. “चला पाटील साहेब मी येतो.” अरे जेवण तरी करून जा! पाटलांनी विचारले. “नको घरी वाट बघतात आणि तुमच्या समोरच घरी जेवण बनवले.” “हो हो ते पण ठीक आहे सांभाळून जा.” मग अमितचे बाबा त्यांच्या घरी आल्यानंतर पाय वगैरे धुतले आणि जेवायला बसले. त्याने अमित च्या आईला सांगितलं की

"अमितच्या शिक्षणाची टेन्शन घेऊ नकोस. पाटील साहेब म्हणाले की ते खर्च करणार आहेत." "पण आपल्याकडे जमीन वगैरे काहीच नाही लहान द्यायला? मी ते पण सांगितलं" त्यावरच ते म्हणाले "तु टेन्शन घेऊ नकोस आणि सांगितलं की तो हुशार मुलगा आहे ही सगळं करीन त्याचं." मग ते तिघ सुद्धा जेवायला लागले. जेवण झाल्यानंतर अमितच्या बाबांनी विचारले, मुंबईला काय काय झालं सांग मला जरा? मग अमितने त्याना फोटोग्राफच दुकान आणि मीटर सोडून सगळं काही सांगितलं पण मध्ये त्याला कंटाळा आला होता त्यावर. त्याची आई वडिलांना म्हणाली, " अहो पोरगं थकले आता उद्या काय विचार आहे आता झोपा." अंथरुणात पडल्या पडल्या अमित विचार करू लागला की असं काय असेल चिन्याकडे? त्याने गाडीमध्ये नाव सांगता उद्या शाळेत सांगणार आहे?

त्याच्याकडे काहीतरी काम असेल का? किंवा पुन्हा त्याचा मामा म्हणजे मंगेश दादा गावी येणार आहे मंगेश दादा गावी येणार आहे ? तो जरा गावी येणार तो चांगलाच आहे त्याला मी मीटर आणायला सांगतो आणि नंतर तो गावी आल्यावर त्याला मी पैसे देतो. एवढे तरी विश्वास आहे असेल त्याच्यावर. असाच विचार करता करता आम्ही झोपला. दुसऱ्या दिवशी अमित ने पटकन आंघोळ केली पटकन नाश्ता केला आणि धावतच शाळेमध्ये. जायला लागला. आणि म्हणाली आई म्हणाली अरे हळू जा अजून शाळेला उशीर आहे. "जाऊदे त्याला शाळेच्या च्या गडबडीत एकमेकांना सोबत जात असेल. हे त्यांचं शेवटचं वर्ष त्यानंतर कोण कोणाला भेटत नाही, लवकरच शाळेला अभ्यासाची सुट्टी लागेल" अमितचे बाबा म्हणले तरीसुद्धा अमित नाहीसा होईपर्यंत त्याची आई बघत होती. अमित १०-१५ मिनिटात शाळेत पोहोचला. फक्त चार-पाच विद्यार्थी आले होते पण

त्याच्यामध्ये चिन्या नव्हता. मग अमित चिन्याची वाट बघत बसला. अजून पंधरा मिनिटात चिन्या आला. आणि अमितते विचारले काय रे काय गंमत सांगणार होतास? अच्छा 'गंमत' त्याच्यासाठी आज तू आज लवकर आलास काय? "हो म्हणजे तर कसं समजत... काही नाही रे तुला माझा मामाचा मुलगा म्हणजे माझा मोठा भाऊ अखिलेश माहिती माहित आहे? "हो माहित आहे मागच्या वेळेस दिवाळीमध्ये आला होता!" "त्याला अजून सायकल चालवता येत नाही म्हणून सगळे गावचे मुलं त्याच्यावर हसले होते. त्यानंतर... तो गावी आलाच नाही. होतं तो जिल्ह्याच्या ठिकाणी राहतो ना.? त्याचं काय झालं ते सांग? चिन्या म्हणाला "अरे आता आपल्या जिल्ह्यामध्ये फ्लपकार्ट आणि बेमेझॉन ची सर्विस चालू झाली आहे" तू आता जे पण गॅजेट वेबसाईटवर बघतोस ते तू त्याच्या ॲड्रेसवर मागू शकतोस? आणि हे कोणी सांगितलं? अमितने विचारले "अरे मी तरी मी त्याला फोन केला होता तेव्हा आपण मुंबईला होतो तेव्हा आणि तुला काय हवंय ते पण सांगितलं होतं." तेव्हा त्याने सांगितलं अमित साठी ही सगळ्यात गुड न्यूज मोठी होती.

त्याने आणि चिन्याने मिळून त्या दिवशी खूप गप्पा मारल्या अमित खूप एक्साईड झाला होता. कधी एकदा जाऊन अखिलेश ला भेटतो असे त्याला वाटत होते. इतक्यात त्याला आठवले की अरे आज पाटील साहेब जिल्ह्याच्या कचेरीत जाणार आहेत, पण शाळा सुटल्यावर जातील किवा अगोदर जातील हे त्याला माहीत नव्हते. त्यामुळे तो शाळा सुटायची वाट बघत होता. चिन्याने सांगितले की "मी त्याला तुझा नंबर देतो मी बोलून घ्या फोनवर." हो हे पण चालेल. असे पुटपुटत अमित वर्गातच

बसला. दुपारी शाळा सुटली. अमित भरभर घरी जाऊ लागला. म्हणजेच आधी ती बेवड्याची झोपडी. अमित ने कानात बोटे घातले व बेवड्याची झोपडी क्रोस केले. "मला दारू दे ना" असा आवाज त्याला आला नाही त्याच्यामुळे झोपडी क्रॉस केली त्याने कारण ते कानातले बोट काढले लगेच आवाज आला..." मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स" ... अमित ने पुन्हा कानामध्ये बोटं घातली व जवळ जवळ धावतच घरी निघाला. आई कोंबड्यांना दाने टाकत होती.... अरे हळूहळू पण तुझ्या मागे कुत्रे लागले का? "नाही पण पाटील साहेब कचेरीला गेले का?अमितने विचारले "मी काय खाजगी नोकर वाटली का? मला कसं माहित असणार ? आई मी अण्णा पाटलांकडे कडे जाऊन येऊ का? पण मीटिंग आहे की काय? विचारून बघतो? ठीक आहे जा? आई ने परवानगी दिली.

# मिशन अखिलेश

पाटलांच्या वाड्यामध्ये वाड्या बाहेर गजबज चालू होती पाटलांनी त्यांच्या गडाल्या सांगून त्यांची खिल्लारी बैलाची जोडी बैलगाडीला लावली होती ‘ अच्छा म्हणजे पाटील अजून सध्या गेले नाहीत असे दिसते. पण आता लगेच जाणार आहेत असं दिसतंय’ मनातल्या मनात अमित म्हणाला.

“काय रे राम्या झाला का गाडीला बैल बांधून आपल्या कचेरीला जायचे माहित आहे ना.? पाटलांचा जोरदार आवाज आला.

‘राम राम’ पाटील साहेब अमित म्हणाला

‘राम राम राम राम’ अण्णा पाटील हसत म्हणाले “अरे अमित ?? आणि शाळेला काय सुट्टी आहे?

“पाटील शाळेला जाऊ आलो” अमितने सांगितले .

पाटील साहेब “मी सुद्धा जिल्ह्याला येतो ना तुमच्या सोबत?” अमितने विचारेले

“मला काही प्रॉब्लेम नाही पण तुझी आई वडील??? त्यांना विचारले का ?”

“नाही सध्या त्यांना काय विचारलं नाही, पण तुम्ही सांगितलं तर ते काय नाही म्हणणार नाही !’

“अच्छा म्हणजे बच्चू माझ्याच खांदावरून नेम लावतोय या हुशार पैलवान आहेस!”

रामा गड्याने बैलगाडी समोर समोर आणली आणि पाटलांच्या सुनेने नारळ वाढला वाढला

“तर .. येतो अमित कचेरीला??”

अमित खुश झाला आणि गाडीत बसला मग पाटील बसले आणि पुन्हा त्यांच्या सुनेला बोलवले की त्यांची कुऱ्हाड आण.

अमितने विचारले पाटील साहेब कुऱ्हाड कशाला?

अण्णा पाटील म्हणाले “अरे येताना आपला उशीर वगैरे झाला संध्याकाळची आपल्याकडे असलेली बरी म्हणून घेतली.

अमित म्हणाला “पण आपल्या गावात कुठे नाहीत लुटारू नाहीत मग?”

अरे असलेली बरी. त्याला काय लायसन्स लागतंय होय? पाटील हसले.

रामा काकांनी बैलांना एकच फटका दिला, बैल लगेच धावू लागले .

रत्याध्येच अमित चे घर येणार होते पाटलांनी बैलगाडा थांबवायला सागितला, आणि रामगड्याला ला सागितले " रामा तू अमित च्या

घरी जाऊन सांग अमित माझ्या सोबत कचेरीत येतोय, संध्याकाळी उशिर होयील, काळजी करू नका माझ्या सोबतच असेल "

रामा जसेच्या तसे सांगितल , अमितची आई बाहेर आली आणि म्हणाली,' पाटील साहेब, १० वीचे वर्ष आहे, त्या नंतर त्याला घेवून कुठ्य पण जा. आता त्याला अभ्यास करायाल सांग"

अहो अभ्यास करेलच , एक दोन दिवसांनी काही होत नाही. पाटलांनी सांगितले.

# घरच्या घरी (होम डेलीवरी)

रामूने निरोप घेतला ‘आता चला वहिनी येतो. रामाने गाडी काढली आणि बैलाच्या शेपटीला पीळ देत बघ निघाला. पाचच मिनिटात बेवड्याची झोपडी जवळ आहे तेव्हा अमितने कानामध्ये बोट घातली तसे पाटील तुम्ही कडे बघत राहीले मग गाडी रस्त्याला लागली तेव्हा पाटलांनी विचारले काय रे अमित कानामध्ये बोट का घातलं? आणि अमितने सांगू का नको असा विचार केला, शेवटी सांगायचं असे त्याला वाटले पाटील काय म्हणतात - ते म्हणू दे. अमित म्हणाला, ‘जेव्हा पण मी झोपडीच्या बाजूने जातो किंवा कानामध्ये कसला तरी आवाज येतो अमितने सांगतले . पाटील साहेबांनी विचारले कसला आवाज? “दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स... असा आवाज? का? अमित “हो” म्हणाला . त्यावर पाटलांच चेहरा चिंताग्रस्त झाला. अमितने विचारले काय झालं पाटील? काय नाही मला मला पण एक दोनदा तसा आवाज आलेला नंतर मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं हळूहळू बंद झाला. तु लक्ष देऊ नकोस. आणि हो दररोज शाळेतून आल्यावर आपल्या गावचा बजरंग बलीचे मंदिर आहे त्यांच्या देवळात जात जा. समजलं? हो पाटील साहेब... अमितने विश्वासाने पाटलांचा हात

हातात घेऊन सांगितलं. मग त्यावर पाटील काय बोलले नाहीत.(पण मनात ते पण थोड घाबरले होते) माझ्यासोबत जिल्ह्याच्या ठिकाणी काय म्हणून येतो? अमितने उत्तर दिलं, "तिकडे चिन्याचा मामे भाऊ राहतो अखिलेश! त्याच्याकडून पाच पाच मागील वर्षाचा प्रश्नपत्रिका घ्यायचे आहेत ते प्रश्न आम्ही मिळून घरी सोडवणार. अरे पण त्याचा पत्ता वगैरे माहिती आहे का? कचेरीच्या मागच्याच बाजूला त्याचं मोठं घर आहे एवढं माहित आहे, तसेच मी त्याचा मोबाईल नंबर घेतला आहे, आपण तिथे गेल्यावर मी त्याला फोन करतो. हुशार आहेस किं! पाटील म्हणाले असेच गप्पा मारत ते अर्ध्या पाऊण तासांनी जिल्ह्याच्या ठिकाणी पोहोचले

रामाने बैलगाडी लावली आणि बैल त्यांना सुद्धा सावलीत बांधले. मग अमितने अखिलेश ला फोन केला आणि त्याला सांगितले की तो आला म्हणून.

अखिलेश : अरे मी आता जेवतोय दहा पंधरा मिनिटात येईन कचेरी मध्ये, चालेल का? नाहीतर एक काम कर तू एकडे ये जेवायला घरी.

अमित : अरे सध्या भूक नाहीये. तुझ जेवण झाल्यानंतर डायरेक्ट कचेरीत ये.

अखिलेश: ठीक आहे

दहा मिनिटात अखिलेश आला.

आणि अमितने आणि अखिलेशने गळा भेट केली.

अमित : अरे अखिलेश तू अजिबात बदलला नाही !!!

अखिलेश : पण तू उंच झालायस!!

अमित : हो सायकलचा चालण्याचा प्रताप. तू सायकल शिकला का?

अखिलेश : जाऊ दे. आता बघ स्कुटीच्या किल्ल्या दाखवत अखिलेश म्हणाला

अमित : अरे वा गाडी घेतली? चांगल आहे!

अखिलेश : ते सगळं सोड आपण का भेटलो ते सांग?

अमित : कालच चीन्या ने सागितलं होतं किं, बेमेझॉन कंपनीची डिलिव्हरी आपल्या जिल्ह्यामध्ये होते?

अखिलेश: अगदी खर आहे. तुला काय सांग काय ऑर्डर करायचे सांग

अमित : काही खास नाही रे एक मीटर आहे . थांब दाखवतो.

असे म्हणत अमितने अखिलेशचा मोबाईल हातात घेतला त्यामध्ये त्यांनी एक अप उघडला

ॲप उघडता उघडता अमितने सांगितलं की ह्याचे जे काय पैसे असतील ते मी तुला रोकड देईन.

अखिलेश : अरे भाऊ टेन्शन नाही, पहिले ते मिटर का मशीन तरी दाखव.

अमित : त्याने EMF मीटर दाखवले अरे वा! याची किंमत कमी झाली की पंधराशे होती आता १२०० झाले!

अखिलेश: ठीक आहे ओर्डर कर.

अमित: ऑर्डर करायला घेतले, किंवा ऍड्रेस चा ऑप्शन आला तेव्हा अखिलेशने त्याचा घरचा ऍड्रेस टाकला, आणि जेव्हा पेमेंट ऑप्शन आता किंवा आम्ही ऑनलाईन म्हणून सिलेक्ट केले.

**अखिलेश : चला आता सगळं झालं करू का ऑर्डर?**

**अमित : कर ..... थोडासा घाबरत म्हणाला !**

**अखिलेश : अरे घाबरतो काय जर आपल्या ॲड्रेस मध्ये येणार नसेल डिलिव्हरी तर, डायरेक्ट ई-मेल करून सांगत ते की देत नाही आणि आपले पैसे वापस मिळतात!!!**

**एकूण हे ऐकून अमित जरा रिलॅक्स झाला**

**त्यानंतर दोघांनी एकमेकांना बाय बाय केले आणि अखिलेश जायाला निघाला**

**अरे पोरा लवकर निघतोयस? अण्णा पाटलांनी अभिलेशला विचारले?**

**हो पाटील साहेब आता धंद्याचा टाईम झाला. मी जर दिसलो नाही तर वडील वैतागतील.**

**ठीक आहे ! बरोबर जा.**

**नंतर पाटील साहेबांनी रामा बैलगाडी जूपायला सांगितले**

**बैलगाडी तयार झाली तेव्हा पण त्यांच्या गावी जायला निघाले.**

**अण्णा पाटलांना नमस्कार करण्यासाठी अजून चार-पाच लोक आले होते त्यांनी पण अण्णा पाटलांनी त्यांचा राम राम घेतला आणि ते पण गेले. बैलगाडी जेव्हा मुख्य रस्त्याला आली तेव्हा अक्षरशः बैल पळायला लागले.**

**कारण खाऊन पिऊन आणि आराम करून बैल सुद्धा ताजे तवाने झाले होते.**

अर्ध्या पाऊण तासातच हे त्यांच्या गावाच्या वेशीला लागले. जेव्हा बेवड्याची झोपडी लागली तेव्हा आम्ही अमित कानांत बोट घालू लागला. की त्याला कुठल्याही प्रकारचा आवाज नको यायला. तशी त्याला भीती नव्हती कारण त्याच्यासोबत अण्णा पाटील होते, आणि त्यांच्याकडे हिम्मत आणि कुराड सुद्धा होती. जेव्हा त्या लोकांनी बेवड्याची झोपडी ओलांडली. तेव्हा अमितला बरं वाटले की त्याला कुठल्याही प्रकारचा आवाज आला नाही.

अमित आता तुझं घर येईल. पाटलांनी सांगितले.

पाटील साहेब मी तयार आहे. अमित बोलला.

पाच मिनिटात अमितचे घर आले. त्याने पाटलांना धन्यवाद म्हटले आणि तो घरी जायला निघाला बाहेर त्याची आई आणि बाबा बाहेरच त्याचीच वाट बघत बसले होते.

अमित आणि पाटलांनी बघून दोघांना हायसे वाटले. 'पाटील साहेब ! घरी या थोड्यावेळ बसा येऊन जेवण करून जा'. अमितचे चे बाबा म्हटले.

'आज नको आमची पण मंडळी घरी वाट बघत असेल निघतो मी'

'बर' अमितचे आई वडील म्हणाले.

अमित तुझ्या पुस्तकाचं काय ते काम झालं का? अमितच्या बाबांनी विचारले.

हो बाबा.

आई जेवण दे ना.. अमित पोटावर हात फिरून म्हणाला.

का पाटील साहेबांनी जेवण दिला नाही की काय?

तसं नाही पण आता भूक लागली आहे.

ठीक आहे तेथे हात पाय धुऊन आत मध्ये ये.

आलोच म्हणत अमितने पटकन उडी मारली !!

बाबा तुमचा फोन द्या ना आकाश दादाला फोन करायचा.

का रे काय झालं?

काही नाही त्याच्यासोबत प्रश्न पत्रिका बद्दल बोलायचं होतं.

ठीक आहे आत मध्येच आहे चार्जिंग लावला आहे. बाबा बोलले.

अमितने आकाशला फोन लावला आणि त्यासोबत बोलायला लागला तेवढ्यात आई म्हणाली अरे आता तर तुला भूक लागली होती आता फोनवर बोलतोय का?

'नाही अग दहावीच्या प्रश्नपत्रिका बद्दल विचारायचं होतं म्हणून आकाश दादाला फोन लावला तुला बोलायचे काय सांग? हो दे मला फोन.

अमितने आईला फोन दिला आणि स्वतः जेवायला बसला एवढयात अमितचे बाबा आत मध्ये आले त्यांनी पण वाढून घेतलं ते पण जेवायला लागले.

आणि अमितने थोडा गप्पा मारल्या सोबत आकाश नंतर फोन ठेवून गेली . जेव्हा अमित जेवण झालं अमितने पुन्हा फोन घेतला आणि बाहेर आला आणि आजची गंमत सांगायला लागला...अरे वेडा आहेस की काय? आकाश नाही विचारलं (आकाश दुसऱ्या बाजूने)

अमित: "अरे दादा ते मी पैसे स्वतः साठवले होते पाच रुपये दोन रुपये करून. आणि मग अखिलेशने सांगितले की जर त्यांच्याकडे डिलिव्हरी

**येणार नाही तर ते ईमेल करून त्यांना सांगतील म्हणून मी पैसे द्यायला तयार झालं.**

**आकाश: आणि मी पैशासाठी नाही सांगत आहे. मी त्या EMF मीटर बद्दल सांगतोय सांगतोय.**

**अमित : तू नको टेन्शन घेऊ मी बघीन काय ते.**

**आकाश: ठीक आहे बाबा तू मोठा झालास फक्त अभ्यासासोबत काही मस्ती करू नकोस मी दहावीचे वर्ष आहे ते विसरू नकोस. आणि हो, गावच्या हनुमान मंदिरात अधे मध्ये जात जा.**

**अमित : ते आहे माझ्या लक्षात उद्यापासून फक्त अभ्यास जोपर्यंत दहावीची परीक्षा होत नाही ठीक आहे?**

**आकाश : ठीक आहे**

**अमित : चल जातो आता मी झोपायला.**

**आकाश : ठीक आहे गुड नाईट**

**अमित : हो तुला पण गुड नाईट बाय बाय.**

# कट्टी बट्टी

दुसऱ्या दिवशी सकाळी अमित खूप एक्साइड झाला होता. तो एकदा चिन्याला भेटतोय असे झाले होते

किंवा पहिल्या तासाची घंटा झाली तेव्हा चिन्या आला

काय रे चिन्या उशीर का झाला? अमितने त्याने विचारले.

अरे काही नाही आमच्याकडे पाहुणे आले होते

ठीक आहे ठीक आहे पाहुणे आहेत का गेलेत?

आता निघतील पण मी त्यांच्या अगोदर निघालो कारण ते जाताना मला शाळेला उशीर होत होता पण मला वाटल ते जाताना मला पैसे देतील म्हणून तिकडेच घुटमळत होतो.

अरे वा किती रुपये मिळाले तुला?

चिन्या : वीस रुपये मिळाले.!! चला सोरट खेळायची सोय झाली.

अमित : सोरट वगैरे काही नसत आपल्याला मूर्ख बनवतात ते लोक.

चिन्या : अस काय ! तुझं मीटर खर आहे? सोरट खोट आहे ना?

आला मोठा भुतांचा सायंटिस्ट.

अमित चिडला आणि ते अमितची आणि चिण्याची भांडण सुरू झाली.

अमित आणि चिन्या उभे रहा सरांनी सांगितले.

तुम्ही का भांडत आहात?

“सर चिन्यां ना सोरट खेळतो! मी त्याला सांगितले असं करू नकोस तर तो माझ्यावरच वैतागला म्हणून आम्ही भान्डायला लागलो.”

“नाही सर उलट अमितच बेवाडयाच्या झोपडीजवळ भूत आहे आणि त्याच्यावर प्रयोग करायचा आहे म्हणून त्यांनी काल एका मीटरची ऑर्डर दिली तर मी जरा सांगितलं तू का त्याच्यावर पैसे घालवतो तर तो माझ्या सोबत भांडण लागला”

सगळे वर्गातले विद्यार्थी बेवड्याच्या झोपडी आणि भूत बद्दल बोलायला लागले. वर्गांत एकच गल्ला झाला.

सरांनी “समजावले की भूत वगैरे काही नसतं आणि सोरट एक प्रकारचा जुगार आहे ते पण खेळणं वाईट” आणि दोघांना खाली बसवलं.

सदरचा प्रकार ऐकून वर्गातली मुलं हसायला लागली, अमित आणि चिन्या एकमेकांकडे बघत राहिले.

शाळा सुटल्यानंतर दोघं एकमेकांशी न बोलताच घरी गेले. घरी गेल्यानंतर अमित ची आई अमितला विचारत होती अरे अमित काय झालं असा चेहरा का पाडून बसल्यास? त्यावर अमित म्हणाला काही नाही माझा आणि चिन्याचा भांडण झालं. अरे का भांडण झालं तुमचं शेवटचं वर्ष आहे असं भांडण करणार का? उद्या शाळेत गेल्यानंतर चिन्याची माफी माग आणि पुन्हा बोला कारण दहावी नंतर कोण कुठे राहील कोण कुठे राहील याचा काही आता पत्ता नसतो आणि तू तर म्हणतोयस तू पण पुण्याला जाणार दादासोबत मग त्यानंतर चीनुला कसा भेटणार तूच सांग? आकाश दादा वर्षातून एकदाच येतो ते पण आपल्या घरीच थांबतो जेव्हा जायला निघतो तेव्हा त्याची सगळे मित्र त्याचे सगळे शाळेतले बाई मॅडम सर लोक अजून पण त्याला लक्षात

ठेवतात? हे मला काय तुला सांगायला नको. तुझं तूच बघितला आहेस. अमित म्हणाला हो मी समजतो.

आई: एवढा तर समजदार आहे तर भांडण कशाला काढलास? पण अमितला बेवड्याची झोपडीबद्दल घरी सांगायचं नव्हतं म्हणून गप्प राहिला त्यांनी चिन्याचा अजून काय खोडया सांगितल्या नाहीत. त्यांनी आईला वचन दिलं की उद्या तो त्याच्या सोबत बोलेन.

आणि दुसऱ्या दिवशी शाळेत चिन्या आणि अमित भेटले अमितनेच माफी मागितली. चिन्या म्हणाला "अरे माफी काय मागतोस हे आपलं शेवटचं वर्ष असं भांडायचं नाही आपण ठीक आहे?" चिन्या म्हणाला

अमित म्हणाला ठीक आहे. मग चिन्यांनी सांगितलं अरे अखिलेश चा फोन आला होता काल. तो म्हणाला दोन-तीन दिवसात आपली ऑर्डर येणार आहे. हे ऐकून अमित खूप खुश झाला. आणि थोडा नाराज पण झाला. चिन्याने विचारलं काय रे तोंड पाडायाला काय झालं? अरे आपली ऑर्डर येईल अस म्हणालास ना पण किंवा अखिलेश घरी कधी आणून देणार? आणि शनिवार रविवार कोण जिल्ह्याच्या ठिकाणी जाणार? आणि आपण सायकल चालवत गेलो सुद्धा तरीपण खाण्याचे वगैरे प्रॉब्लेम होतील आणि येताना संध्याकाळ होईल. अरे संध्याकाळी झाली तर चांगलंच आहे ना.. चांगलं कसं काय? अमित ते विचारले. अरे संध्याकाळी तुला त्या मीटरचं काम बघता येईल ना. अरे हो ते पण आहे. कारण संध्याकाळी किंवा रात्री माझी आई वडील बेवड्याची झोपडीकडे पाठवणार नाही. ठीक आहे मग ठरलं तर एकदा ती मीटर आलं की आपण दोघं पण सायकलवरून जिल्ह्याच्या गावात जायचं आणि ते मीटर घेऊन यायचं ठीक आहे? खूप खूप धन्यवाद मित्रा. पक्क ठरलं! तर आता अभ्यास करूया! त्याच दिवशीच

आकाश दादाचा फोन आला होता तो म्हणाला मीटर दहावीच्या रिजल्ट नंतर देणार. पण मी त्याला सगळं खरं खरं सांगितलं. आता बघू या. वर्गामध्ये शिरता शिरता अमित आणि चिन्या गुपचूप हसायला लागले. पण त्यांना हसताना बघून सर म्हणाले अमित आणि चिन्या उभे रहा तुमचं काय चाललंय सांगा. आजच्या विषयाच्या वर जर काही इम्पॉर्टंट असेल तर आम्हाला सगळ्यांना ऐकायचा आहे. नाही सर काही नाही !!आय एम सॉरी सर चिन्या म्हणाला.

असेच पाच तास निघाले व त्यांची शाळा सुटली. त्यानंतर सगळे विद्यार्थी घरी निघाले. चिन्या वरच्या गावात राहत होता आणि अमित खालच्या गावात. त्यामुळे कसं जायचं वगैरे ते प्लान करत होते. अमित म्हणाला संध्याकाळ झाली ना तर मला भीती वाटेल तू माझ्याकडे राहायला येशील का? चिन्या म्हणाला अरे आपण शनिवारी जाऊ म्हणजे माझ्या घरचे मला शनिवारी रात्री मग रविवारी जाऊया तुझ्याकडे राहायला पाठवतील! ठीक आहे? अमित म्हणाला हो चालेल. मस्त गप्पा मारत दोघेजण हसत खेळत आपापल्या घरी निघाले.

वाटेत जाताना व येताना अमितला बेवड्याची झोपडी लागतच होती. झोपडी जशी जवळ आली तशी अमितने जय हनुमान जय श्रीराम असे बोलायला सुरुवात केली. आणि तिथून भरभर निघाला. “मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स” असा आवाज अमितला आला त्याच्यावर दुर्लक्ष केले व पटापट चालत दहा मिनिटातच तो घरी पोहोचला. हनुमान जय श्रीराम असे बोलत असताना पाय धुतले व घरात पोचला, आई म्हणाली अरे काय रे तुमची कट्टी - बट्टी झाली का? ? हो हो झाली! आता येत्या शनिवारी किंवा पुढच्या शनिवारी मी चिन्याला आपल्या घरी बोलवला आहे. तुझी परवानगी आहे का? अरे चिन्या पण माझ्या

मुलासारखा मुलगा आहे तुला परवानगी कशाला हवी. येऊ दे त्याला कधी पण. येस !!! असे बोलून अमित ने एक उडी मारली. अमित खुश आहे हे बघून आम्ही ची आई सुद्धा खुश झाली तिनी पीठ मळायला घेतले. अमित गाईला चारा टाकायला गेला. अर्ध्या तासानंतर त्याचे बाबा रमेश आले. काय अमित आज खूपच खुश दिसतोय!!अमितची आई पण बाहेर आली आणि म्हणाली खुश न व्हायला काय झालं? त्याचा मित्र चिन्या घरी एक दिवस राहिल्या येणार आहे. बरं आहे की येऊ दे. मी पण त्याला तेच म्हणाले, म्हणून तो खुश झाला. अरे वा बाबा पण तयार झाले!! अमित खूप आनंदी झाला.

# चला जिल्ह्याला

**अमित आणि चिन्या पुन्हा शाळेत भेटले. की चिन्यांनी सांगितलं अरे अमित तुला एक गुड न्यूज आहे. काय लवकर सांग नाहीतर सर मॅडम येथील मग आपल्याला बाहेर काढतो. सांगतो रे ऐक तर .... अरे काल अखिलेशचा फोन आला होता. अमित एक्साईड झाला अरे वा काय झालं? तो म्हणाला? अरे आपला EMF मीटर आला आहे! पण ते कसं चालू करतात अखिलेश ला माहित नाही. त्या मीटर सोबत मध्ये एक पुस्तिका आहे. पण त्याच्यावर सगळं इंग्रजीमध्ये दिला आहे त्यामुळे त्याला वाचायचे प्रॉब्लेम होतात. ठीक आहे ना त्यात काय आपण त्याला दाखवू. व तेच तर मी त्याला म्हणालो आम्ही या शनिवारी येतोय आम्ही तुला सांगू. पण तो म्हणाला तुम्ही येऊ नका मिच येतो. अरे त्याला फोर्स करायचं ना तु नको, आम्ही येतो. – अमित. अरे खूप सांगितलं तर तो काही ऐकत न्हवता, तो म्हणाला कि, त्याचा कडे स्कुटी आहे तोच येणार. मी काही बोलू शकलो नाही- चिन्या, ठीक आहे आता येत्या शनीवारी बघु.- अमित.**

# शनिवारची रात्र.

शनिवारी शाळा सुटल्या वर चिन्या व अमित दोघे अमितच्या घरी निघाले. वाटेतच बेवड्याची झोपडी लागली तेव्हा अमितने कान बंद केले. ते बघेन चिन्याने सुद्धा कानावर हात ठेवले, संध्याकाळी थंडी होतीच, तर सुद्धा अचानक एक थंड गार हवेचा झुळूक आला ते सुद्धा बेवड्याची झोपडी ओलंडताना दोघांना जाणवल. दोघ जोरजोरात चालू लागले. अक्षरश: पळू लागले. १० मिनटात ते अमितचा घरी पोचले.

अमितची आई : अरे वा पोरानो आलात? आणि धावत यायची काय घाई? पडले असते तर?

अमित: अग तस काही नाही, खूप दिवसनी चिन्या वरच्या गावात आला आणि मी सायकल नेली नव्हती बस.

अमितची आई : बर बर बसा तुम्ही गप्पा मारत मी चहा ठेवते

चिन्या : नको मावशी , मी चहा नाही घेत, लगेच जेवण करू .

# EMF मीटर चालू झाली आणि...

अखेर त्या शनिवारी दुपारी चारला अखिलेश आला, आणि चिन्या अमितला भेटला पण थोडा घाबरलेला होतो. चिन्या अमितने विचारल काय रे काय झाला? तेव्हा अखिलेश म्हणाला अरे मी काल पासून ते EMF मिटर चालु करायचा प्रयत्न करतोय काही झाल नाही पण जस मी अमितच शेत क्रॉस करायल घेतल, तसा अचानक त्या EMF मिटर चालू झाल हिरवे बल्ब लागले आणि मिटर मधून टीव टीव असा आवाज यायला लागला, मी गाडी थांबवली आणि EMF मिटर बघायला लागलो, तसे त्या EMF मिटर ची काटे सगळ्यात शेवटच्या पोइंट वर पोचले. आणि एवढ्या दुपारी सुद्धा शांत हवेचे झुळूक आली आणि “मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स” असा आवाज आला कानामध्ये आला. मी घाबरलो... चिन्या आणि अमित एकमेकांकडे बघत राहले. अमितने स्वत: ला सावरले आणि म्हणाला “ठीक आहे, आपण गावच्या मारुतीच्या मंदिरात जाऊया, तसं पण आज शनिवार आहे.” अखिलेश आणि चिन्या दोघेही तयार झाले. अखिलेशच्या स्कुटी ने ते लगचे पोचले सुद्धा. आज शनिवार असल्याने आज पुजारीबाबा लवकर आले होते. अखिलेशने गाडी थांबावल्यावर ते

दोघे उतरले पुजारीबाबाने तिघाचे घाबरलेले चेहरे बघून त्याना विचारले “ का रे पोरानो, काय झाले?” तेव्हा अखिलेशने झाला प्रकार सांगितला. मग पुजारीबाबाने खरी गोष्ट सांगायला सुरवात केली.

**“गणू” काकाची कहाणी : पुजारीबाबाच्या शब्दात**

“गणू काकाची कहाणी : गेल्यापासून मंदिराच्या मागच्या वाडीमध्ये (जिथे देशी दारूचा अड्डा होता) त्याचं दारुडं भूत भटकतंय!”**
गणू काका गावातील एक भारी दारुड्या माणूस होता. त्याचा रस्त्यावर अपघात झाला आणि तो ठार झाला.
म्हणतात त्याचं शेवटचं वाक्य होतं –
**“दारू संपलीय... मला दारू दे ना श्यस्स्ससस्स्स्स!”**

त्याच्या मृत्यूनंतर जे लोक त्याचा झोपडी पासून जातील त्यांना गावातील लोकाना रात्री फुसफुसून आवाज यायचे –
“दारू दे ना? श्यस्स्स्ससस्स्स्स चल... माझ्यासोबत...”

एका रात्री जितेंद्र गणुच्या झोपडीच्या मागे गेला.
तेथे कोणी दिसत नव्हतं... पण अचानक हवा गार झाली.
हाडं कापणारी थंडी...
जितेंद्र नाना च्या कानात आवाज: मला दारू दे ना श्यस्स्स्ससस्स्स्स
**“माझं शरीर गेलं... पण तहान नाही गेली... मला तुझं शरीर पाहिजे!”**

आणि तिथून जितेंद्र नाना तो स्वतःच्या घरी गेला.
जितेंद्र नानाचा आवाज बदलला, चाल बदलली, डोळे लाल झाले.
आणि तो स्वतः च्या घर तपासयला लागला.

तो कधी घरात नसलेल्या गोष्टी बघू लागला –
“तो बसलाय! तिकडे खुर्चीवर बघा... तो अजूनही पितोय!”
त्याचा बाईकोचा हात जोराने पकडून म्हणाला,
**“तू मला अडवलीस तर आधी तुलाच घेऊन जाईन!”**

बायकोनी घाबरून मला बोलावले.
मी जितेंद्र नाना ला पाहताच थरथरत म्हणालो –
“याच्या शरीरात जितेंद्र नाही... त्याच्या पोटात दारूची व्यसनाची जखडणं आहे. ते भूत नाही... गणू काका आहे तो त्याची अपूर्ण इच्छा आहे!”
देवळाच्या आतील खोलीत पूजा सुरू झाली.
भुताचा आवाज –
**“मला मुक्त करा... नाहीतर जित्याला मी संपवेन!”**
सगळ्यांनी मंत्र म्हणायला सुरुवात केली...
जितेंद्र नाना जमिनीवर पडून थरथर कापू लागला...
डोळ्यातून अश्रू नव्हे, **टपक-टपक दारूच्या थेंबासारखं पाणी गळू लागलं...**

आणि अचानक शांतता.

मग?**गणू काका मुक्त झाले का?**सगळ्या पोरांनी विचारले.
कि... त्यांनी फक्त दुसरं शरीर शोधायला गाव सोडलं?

त्या रात्री जितेंद्र नाना अचानक जागा झाला. घरातील दिवे बंद होते...

जितेंद्र नाना च्या कानात पुन्हा तोच आवाज आला –
**“मी गेलो नाहीये जित्या… मी अजूनही तुझ्यात आहे.”**

जितेंद्र नाना हळू आवाजात म्हणाला –
**“तू कोण आहेस? माझ्यातून बाहेर ये!”**
अंधारातून घोगरा आवाज आला –
**“मी गणू नाही… मी त्याची *सवय* आहे.”
जितेंद्र नाना तू मला का पकडलंस?
** गणू काका बोलला ..... मी तुला नाही… तूच मला बोलवलंस. तुझ्या मनात भीती होती… आणि मी त्या भीतीला ‘दारू’ बनलो.

जितेंद्र नाना : पण मला दारू पिण्याची एवढी इच्छा कधी झालंच नाही!
** गणू काका” : इच्छा नसली तरी *एकाकीपणा* होता…
भूक नसली तरी *तहान* होती…
आणि मी त्या तहानेतून गणू जन्मलो!

** जितेंद्र नाना:** तू मला नष्ट करशील का?
** गणू काका (हसत):** नाही… मी तुलाच तुला हरवायला लावेन… तुम्ही माणसं भुतांशी नाही – स्वत:शी हरता! मला दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स पुन्हा चिडवत!!!

* जितेंद्र नाना:** मग तुला सोडवायचं कसं?
**जीतु” मला बाहेर काढू नकोस…
मला **माफ कर.**

पुढच्या दिवशी जितेंद्र नाना माझ्या कडे आला.
त्याने सारी घटना सांगितल्या.मी शांतपणे ऐकून म्हणालो

**“भुतं दारूत नाही… भुतं *अनुभवांमध्ये* असतात. गणूच्या मरण्यामागे दुःख होते. व्यसन नव्हे.”**

पुजाऱ्यांनी जितेंद्र नानाला गणूच्या जुन्या झोपडीत न्यावं, अशी मी सूचना दिली.
जितेंद्र नाना एकटाच तिथे गेला. घराचा दरवाजा अर्धा उघडा होता.
तो सावधपणे आत गेला…
तिथे एका छोट्या चिठ्ठीत लिहिलं होतं:

**“माझं शरीर गेलं… पण माझी चूक अजून आहे.
माझं व्यसन मला मारलं…
पण माझ्या इच्छेनं आता तुला वाचवायची वेळ आली.
जर तू मला माफ केलंस… तर मी कायमचा शांत बसेन.”**

जितेंद्र नाना च्या डोळ्यातून अश्रू आले…
आणि त्याने हलक्या आवाजात म्हटलं:
**“गणु भावा… मी तुला माफ करतो!”**
त्या क्षणी एक वारं वाहिली…
एक हलकी झुळूक…
घरातून दारूचा वास गायब झाला.
* भुतं नेहमी आत्मा नसतात – कधी ते **गिल्ट (guilt)** असतं.
* व्यसन पिण्यात नाही – **विसरण्यात असतं.**
* आणि कधी *माफ करणं* हा एकमेव उपाय असतो.

## पुढचा टप्पा? "शेवटची लढाई"

थोड वादळ सुरू झाले .
वीज गेलेली. त्यामुळे एकुलता एक बल्बचा प्रकाश होता.गणुच्या बायकोनी आणि एककुलत्या एक पोरीने केव्हाच घर सोडलं होत.
आता झोपडीत फक्त एक मेणबत्ती पेटलेली.
जितेंद्र नाना शांततेत बसलेला. पण हळूहळू आवाज पुन्हा कानात येऊ लागतो—

*" श्यस्स्स्सस्स्स्स जितु माफी दिलीस? पण मी अजून मोकळा झालो नाही! अजून एक तहान बाकी आहे!"*

जितेंद्र नाना थरथरला.
तो जोरात म्हणाला...

**गणुssssssssss"
"“तू भूत नाहीस! तू माझ्या भीतीचा आवाज आहेस! मी तुला मानलं... आता नकार देतो!"

क्षणात मेणबत्ती विझली.
घर काळोखात बुडालं.
पण अचानक... जितेंद्र नानाच्या समोर एक आकृती दिसली.
दारुड्या गणू काकांची छबी —
डोळे लाल अंधरात चमकत होते, हातात अदृश्य बाटली...

गणू काकांचे भूत (कण्हत)

“मी सरळ नाही बोलणार… मी *भय* आहे… तू मला पिऊन टाक!”
*त्या क्षणी हवा गोठली. गणुचा श्वास अडकला.*

पण जितेंद्र नाना शूर झाला.
त्याने हात जोडले.
आणि शांत आवाजात म्हणाला—

*“भीतीवर मात दारूने होत नाही…
होते ती — निर्णयाने!”

तो घरातून बाहेर धावत गेला.
सरळ **गणू काकांचे थडगे\ समाधी ** गाठलं.
वादळ प्रचंड उसळलं होतं.

जितेंद्र नाना थडग्याकडे पाहून जोरात ओरडला—
**“मी तुला माफ करतो! पण माझं आयुष्य मी तुला देत नाही!”**

त्या क्षणी जितेंद्र नाना च्या भोवती **प्रचंड वाऱ्याचा तुफान फेरा** झाल्या.
जणू गणू काका शेवटचा आवाज देत होते—

**“तू जग… मला विसर…”**

एकदम शांतता…

जितेंद्र नाना जमिनीवर कोसळला.

ढग फाटले. चंद्र पुन्हा दिसू लागला.
आणि दूर कुठेतरी शैलीनं एक आवाज ऐकू आला—
**“श्यस्स्स्सस्स्स माझी तहान... संपली.”

पण त्या नंतर गणू काकाच्या भुतानी कोणाला त्रास दिला नाही. पण १५ दिवसापूर्वी पाटील म्हणत होते ते कचेरीला जात असताना त्यांचा कानात आवाज आला “दारू दे ना,sssss” मग तेव्हा ते मंदिरात आले होते. अमित म्हणाला “मी सुद्धा होतो त्यांच्या सोबत जिल्हा च्या गावी गेलो होतो.” ..पुजारी बाबा म्हणाले मला माहित आहे.

आकाश दादाने सुद्धा सांगितलं होत अधे मध्ये देवळात यायला

पुजारी बाबा : अच्चा, पण असे का?

अमित: काय माहित?

चिन्या : पुजारी बाबा हा आज काल भूत शोधयतो.

पुजारी बाबा : भूत असे कोणाला दिसतो का?

चिन्या : मला ते माहित नाही. पण एक यंत्र विकत मिळत, त्याने भूतांच अस्तित्व समजत.

पुजारी बाबा: अस...काय रे अमित हे खरे आहे का ?

अमित : हो काका. अजून मी ते यंत्र तपासलं नाही.

पुजारी बाबा: असं काही करू नको, कशाला विषाची परीक्षा?

हे सगळ ऐकून अखिलेश घाबरला होतो, त्यात त्याने एक सावली मंदिराच्या मागे असलेल्या पिपळच्या झाडामागे दिसली. तो किचाळत खाली पडला. चिन्या अमित आणि पुजारी काकाने त्याच्या तोंडावर पाणी मारले आणि उठवले. मग त्याला विचारले “काय रे अखिलेश

काय झाले , तु अचानक कीचाळास आणि चक्कर येऊन खाली पडलास.

अखिलेश : काही नाही, तुम्ही अशी डेंजर स्टोरी सांगितली.

पुजारी बाबा: ती स्टोरी न्हवती, तो खरा किस्सा गावात सगळ्यना माहित आहे.

अखिलेश : असेल पण तुम्ही तो किस्सा सांगत असताना एक आकृति मला पिंपळाच्या मागे दिसली.

पुजारी बाबा: अच्चा, तो जितुनाना असेल.

सगळे जवळ जवळ ओरडले काय?

पुजारी बाबा: अरे जितेंद्र नाना जिवंत आहे. अमितला माहित आहे. हो कि नाही अमित?

अमितने होकारार्थी मान हलवली.

अखिलेश : आता जीवात जीव आला!!

पुजारी बाबा: बर आता अजून काय विचारच असेल तर विचार नंतर संध्याकाळी मंदिरात गर्दी होते. आज शनिवार आहे.

अखिलेश : घाबरतच म्हाणला, अमित भावा आता त्या EMF मिटर ची परीक्षा घेऊ नकोस.

अमित: ठीक आहे, बघू काय करायच ते.

त्या नंतर सगळ्याने हनुमंताचे दर्शन घेतले .. पुजारी दादाने सर्वांना प्रसाद दिला, खिशात ठेवायाला उदी दिली. मग तिघे पण घरी जायला

निघाले. पुजारी बाबाने सगळ्याना आशीर्वाद दिला. आणि तिघे निघाले.

मंदिर पासून दूर आल्यावर अखिलेशने EMF मिटर अमितला दिले. EMF मिटर कसे असते? ह्याची उत्सुकता चिन्या ला पण होती. जसे अखिलेशने EMF मिटर काढले तसा चिन्याने ते घेतले. चिन्याने त्या मिटरचे सेल बरोबर लावले कि नाही ते बघतले, सेल बरोबर बसवले होते. अमित महित्ती पुस्तिका वाचत होता. त्या मध्ये असे लिहले होते कि " आजूबाजूला नकारात्मक उर्जा असेल तर मोठा काटा उजव्या बाजूला होतो आणि हिरवी लाईट लागते" उत्सुकता सगळ्यांची वाढली होती आता संध्याकाळचे पाच वाजले होते. अमित म्हणाला " अखिलेश तु नक्की घरी जातोय का माझ्या घरी थांबतो? कारण चिन्या माझ्या घरी थांबणार आहे." अखिलेश म्हणाला " मी थांबलो असतो, पण घरी न सांगता आलोय" एवढंच ना? घरी फोन करून सांग चिन्याला ५ वर्षाच्या प्रश्नपत्रीका कश्या सोडवाच्या ते समजावायला इकडे आलोय. बास...

चिन्या: हो मला तर हेच बेस्ट वाटते.

अखिलेश : ठीक आहे, मी सांगून बघतो, पण बाबाने नाही म्हटलं तर मला जावे लागेल.

अमित : ठीक आहे. तु जा तुझ्या वडिलांनी तुला नाही म्हटलं तर.

तिघे निघाले. गाडी चालू झाल्यावर अमित म्हणाला " तु आम्हाला बेवड्याच्या झोपडी च्या अगोदर सोडशील का?"

अखिलेश : तुमच्या लोकांचा डोक फिरली काय? आता पुजारी बाबा ने जे सांगतले त्यांचे जरा सेरीअसली घ्या!

अमित : अरे बाबा तु नको बघूस. आम्ही बेवड्याच्या झोपडी मध्ये जाणारच नाही, तुला म्हटलं ना, आम्हाला अगोदर उतरव तिथुन आणि EMF मिटर ची टेस्ट दुरून घेऊन निघू बस???! आणि चिन्या तु पण येणार नसंशील तर सांग, किंव्हा तु माझ्या घराच्या अलीकडे उतर.

चिन्या : मी पण येणार. जय बजरंग बली!!

अखिलेशने गाडी थांबून घरी फोन केला आणि फोन लाउड स्पीकर वर टाकला. दोन तीनरिंग झाल्या नंतर त्याच्या बाबांनी म्हनजे अप्पांनी फोन उचलला. सगळ ऐकल्या नंतर अप्पांनी नकार दिला.

अखिलेश : बघा मी बोललो ना? आता घरी जाऊया.

चिन्या व अमित म्हणाले ठीक आहे. जास्त काळोख होण्याआधी जाऊया. १० मिनिटात ते बेवड्याच्या झोपडीच्या रस्त्यावर पोचले. अमित आणि चिन्या उतरले. अमितने अखिलेशने EMF मिटर चालूच ठेवले होते. अखिलेश सुद्धा आता बघत होता कि काय होतंय ते. जरा १० मिटर गेल्यावर EMF मिटर चा हिरवा लाईट चालू झाला. अखिलेश घाबरला, आणि म्हणाला कि, “ ठीक आहे मी निघतो....तुम्ही सांभाळून जा!!” त्याने गाडी पळवली. इतक्यात त्याला वाटले की, कोणतरी गाडीवर बसले आहे. बाइकवर एकटाच, वारा चेहऱ्यावर आदळत होता. घड्याळात सहा वाजले होते. मित्रांनी सांगितलं होतं, “त्या बेवड्याच्या झोपडी च्या बाजूने हळू जा — अमित चिन्या म्हणाले तो बसतो म्हणे.” अखिलेश हसला, "भुतं-फुतं मला घाबरवू शकत नाहीत!" तोंड्यात तोंडात अखिलेश पुटपुटला.

तो त्या वळणावर पोहोचला — जुन्या वडाच्या झाडाखाली. अचानक बाइक थोडी जड वाटली. त्याने आरश्यात पाहिलं, पण काही दिसलं नाही. थंडीचा एक झटका गेल्या— तरीही त्याने गाडी चालवत ठेवली.

काही मिनिटांनी त्याला मागून हलकं कुजबुजल्यासारखं ऐकू आलं — "दारू दे ना श्यस्स्स्सस्स्स्स," त्याचं हृदय वेगानं धडधडू लागलं. त्याने मागं बघितलं — आणि डोळे मोठे झाले. मागच्या सीटवर एक आकृति बसलेली होती. ओले, गुंतलेले केस, फाटलेला ओला शर्ट, आणि डोळे पूर्ण पांढरे. डोळ्यातून पाणी नाही, पण धुसर धूरासारखं काही वाहत होतं...

तो जोरात किंचाळायचा प्रयत्न करत होता पण आवाजच फुटत नव्हता. आकृती शांतपणे म्हणाली, "दर वर्षी इथे अनेक माणसे थांबतच नाहीत... आणि परत जातही नाहीत."

अखिलेशने स्कुटीचा वेग वाढवला, पण थोड्याच अंतरावर ती बंद पडली. थंडी वाढली, श्वासही दिसू लागला. अखिलेशने भीतीने हेल्मेट काढला — पण त्याच्या मागे कोणीच नव्हतं.

अखिलेशने कशीबशी स्कुटी चालू केली लगेच यु टर्न मारला पुजारी बाबाने जी खिशात ठेवायाला उदी ती त्याने शर्टाच्या वरच्या खिशात ठेवली आणि पुन्हा अमितच्या घराकडे निघाला. मनातल्या मनात "जय हनुमान जय श्री राम" म्हणत.

अमित आणि चिन्या दोघेही घरी जात होते, अखिलेश ने त्या दोघांनाही गाडी वर बसस्नास सांगितले,

चिन्या आणि अमित दोघानाही एकत्र विचारले " अरे पण तु जाणार होता घरी परत?

अखिलेश काहीही बोलला नाही, त्याने थेट गाडी अमित अमित च्या घरी थांबवली.

गाडी थांबल्यावर त्याने सगळा प्रकार सांगितला. अमित आणि चिन्या धोघेही खूप घाबरले. इतक्यात अखिलेशचा फोन वाजला. त्याने त्याचा बाबांना खोटे सांगितले कि, गाडी खराब झाली आहे, चालू होत नाही, आणि इतक्या संध्याकाळी कोण मेकेनिक पण येणार नाही, मी उद्या येईन. अप्पांनी अखिलेशला ला दम दिला आणि मस्त गावरान भाषेत शिव्या पण दिल्या पण अखिलेशला काही अपवाद न्हवता. अप्पांनी फोन ठेवला आणि अमितची आई बाहेर आली आणि तिने विचारले. अरे वा पोरानो तुम्ही आलात. मी जेवण करायला घेते . आधी तुम्ही चहा घेणार का? अमित आणि चिन्याने जेवण म्हणून हो म्हटले तर अखिलेश म्हणाला चहा.

आई: ठीक आहे मी पहिले चहा ठेवते. कारण आता अमितचे बाबा पण येतील.

हो काकी, संध्याकाळी दुकानावर चहा येतोच येतो,

आई : अरे , अखिलेश?? तु पण !! अमितने चिन्या ने काही सांगितले नाही? बर आहे! थांबा! गप्पा मारा. मी चहा तयार करायला घेते.

अखिलेश : अहो काकी, माझे येणे अचानक झाले.

आई: काही हरकत नाही.

आता तिघे पण गप्पा मारत बसले, अमितच्या दारातून दूर अशी बेवड्याची झोपडी दिसत होती.

"इतनी शिद्दत से मैंने तुम्हें पाने की कोशिश की है कि हर जर्रे ने मुझे तुमसे मिलाने की कोशिश की है!

रात्री सगळे गप्पा मारता मारता झोपी गेले, रात्री ३ वाजता अमित उठला आणि त्याचा बाबांच्या बाजेवर जाऊन बसला. बाजेवर कोण

बसलय हे बघण्यासाठी अमितच्या बाबांनी डोळे उघडले. अमित पुटपुटत होता "रमेश मला दारू दे श्यस्स्स्सस्स्स्स" अमितचे बाबा घाबरले आणि त्यांनी विचारले कोण आहेस तु? गन्या का??.. अमितचा आवाज दुप्पट झाला—अर्धा आवाज एखाद्या मद्यधुंद म्हाताऱ्याचा.

"हिक! कोठे गेलं माझं दारूचं भांडं? पार्टी कुठे आहे? नाचायचंय!" असं ओरडत तो दरवाजा उघडून बाहेरच्या झाडाभोवती गोल गोल फिरू लागला.

अमित आतून ओरडत होता, "थांब! माझ्याकडून हे काय करून घेतो आहेस?"
पण ते भूत अजिबात ऐकायला तयार नव्हतं.

तो वडाच्या झाडाला मिठी मारून रडायला लागला—
"तू माझा खरा दोस्त! मला सोडून जाऊ नकोस!"

घरातले सगळे जागी झाले.

बराच वेळ धुमश्चक्री केल्यानंतर, भूत (गणू) म्हणालं,
"ऐक बाळा... मला शेवटचं एक काम करायचंय. ते तू केलंस तर मी तुझ्या देहातून निघून जाईन."

अमितने थकलेल्या आवाजात म्हणाला, "काय काम?"

"मी मेल्यापूर्वी माझं प्रिय दारूचं बाटली मी इथंच, एका दगडाखाली लपवलं होतं. ते माझ्या समाधीवर ठेव. मग मला कदाचित मुक्ती मिळेल."

**अमित, अजूनही अर्धा झपाटलेला, वाऱ्याच्या दिशेने चालत गेला. दगड उचलला, आणि तिथे खरंच गणू काकाच्या समाधी खाली एक धूळलेली बाटली होती.**

**थरथरत्या हातांनी त्याने ती बाटली उघडून समाधीवर ठेवली.**

**क्षणात त्याच्या अंगावरचं वजन हलकं झालं.**
**थंड वारा शांत झाला.**
**भूताचा आवाज मंदावला—**

**"धन्यवाद रे... आता मी झोपतो..."**

**अमितने आणि सगळयांनी दीर्घ श्वास घेतला.**
**तो मुक्त झाला होता?**

**जसा तो परत जायला वळला, तसाच त्याच्या नजरेस एक चमक दिसली—धुळीत पडलेली गणू काकाची चांदीची शीट्टी.**

**अमितच्या चेहऱ्यावर हसू आलं.**

**पण टेकडीच्या दिशेने एक हलका हिक श्यस्स्स्सस्स्स्स हि...हि..हि..! आवाज आला—**

**"कधी ताडी मिळाली तर... माझ्यासाठी थोडी ठेव... श्यस्स्स्सस्स्स्स हि...हि..हि.."**

**अमित न पाहताच पळाला.**

# EMF मिटर आणि x रे

पहाटे अमितच्या घरातले सगळे पुजारीबाबाकडे गेले. आणि रात्रीचा प्रकार सांगितला. चिन्या ने व अखिलेशने EMF मिटर ची सगळी कथा सांगितली.

रमेश : अहो दादा. काल सगळ्या घरी दारूचा वास येत होता.

अमितची आई : हो ना , हे तर पीत नाही.

पुजारीबाबा: काल तिघेही हुनमान मंदिरात दर्शनासाठी आले होते. मी काल तिघाना सुद्धा उदि दिली होती. काय रे बाळानो. आहे का तुमच्या कडे.

हो आहे. तिघेही एका सुरात म्हनाले.

अखिलेश : काल त्या उदि मुळेच मी तुमच्या समोर उभा आहे,

अमित : अग आई ग..........पोटात दुखतय माझ्या

अमित ची आई आणि बाबा – अचानक कस झाल? आता ह्याला जिल्हाचा हॉस्पिटल ला घेऊन जावे लागेल...

इतक्यात पाटील साहेब पण आले. ते म्हणाले रमेश काय झाले?

रमेशने काल रात्रीचा सगळा गोंधळ सांगितला. मग पुजारी बाबानी पण काल च्या दुपारी सर्व पोर का आली होती ते सांगितल.

रमेश : काय रे अमित का उगाच असे केले. पाटील साहेब आज तुमची बैलगाडी मिळाली असती तर बरे होयील. अमितला जिल्हाचा हॉस्पिटल ला घेऊन जायचा आहे.

अण्णा पाटील म्हणाले , हा काय प्रश्न आहे का? तुझ्या सोबत मी पण येणार..

रमेशने हाथ जोडले.

अमित कळवळत होता.

मग पहाटे ५ वाजता ते जिल्हाचा हॉस्पिटल ला निघाले. रस्तात जात असताना त्यांना बेवड्याची झोपडी लागली, रमेशने अमितचे कान कापडाने झाकले. पण अमित विचित्रपने हसायला लागला. रामागडी घाबरला. त्याने पाटलांना विचारले "पाटील साहेब गाडी पळवू का?" पाटील म्हणाले पळव सुसाट !!! बैल वारासोबत बोलायला लागले. अखिलेश सुद्धा त्याचा मागे स्कुटीवर होताच.

इकडे गावात गणू काकाचे भूत पुन्हा आले अशी आवई उठली, गावच्या सगळ्या बाया अमितच्या घरी येत जात होत्या. चिन्या तीकड असल्याने त्यालाच सगळे सांगावे लागत होते. सगळ्या बाया आंनी अमितची आई म्हणाली कि," बाळा हे सगळे होत असताना एकदा तरी आम्हाला सांगायचं"आणि रडायला लागली.

**चिन्या : मला माफ करा काकु पण .... अमित त्या emf साठी मिटर पूर्ण वेडा झाला होता, त्याचसाठीं त्याच अन माझं वर्गात भांडण पण झालं होती, अगदी परवाच.**

**हो, तुमचं भांडण झालं ते मला सागितलं .**

**गावच्या म्हाताऱ्या कोत्यारा - ते जाऊ द्या. लहान मुलं आहेत ते,भांडणारचं आणि पुन्हा एकत्र येणार . तुम्ही पाटलांना फोन करा, कुठे पोचले आहेत ते बघा .**

**हो लगेच अमितच्या बाबांना करते ,**

**अमितच्या बाबाचा फोन वाजला. तिकडून त्याची आई ने विचारले**

**आई: अहो कुठे पोचले? आणि अमित कसा आहे?**

**अमितचे बाबा : आता १५ मिनटात पोचू, अमित झोपला आहे.**

**आई: ठीक आहे, अधे मध्ये फोन करत जा! जीव लागत नाही! बर... आकाश ला फोन करू का?**

**अमितचे बाबा : नको त्याला फोन करू तो लगेच संध्याकाळची गाडी पकडून येईल. नको करूसं.**

**आई: हो त्याच फार जीव आहे. नाही करत, तुम्ही सुद्धा काहीतरी खाऊन घ्या.**

**अमितचे बाबा : हो हो...काळजी करू नको, पाटील साहेब आहेत सोबत.**

**शासकीय दवाखाना (हॉस्पिटल) येतो, पाटील आणि अमितचे बाबा लगेच व्हील चेयर आणतात. त्याचावर अमित ला बसवतात.**

अमितचे बाबा इस्पितळाचे (हॉस्पिटल) कागद भारतात, आणि अमितला इस्पितळात (हॉस्पिटल) भरती करतात. एक परीच्रिका (नर्स) येते, अमितच BP चेक करते. आणि विचारते " बाप रे" एवढ BP वाढायला काय झाला ह्याला?

अमितचे बाबा: कालचा सगळा प्रकार सांगतात. पण परीचारीकेचा (नर्स )विश्वास बसत नाही, गावचे लोक आहेत जाऊ दे, असा विचार करून ती त्याचावर काही बोलली नाही. तिने फक्त सांगितले कि,आज रविवार आहे, डॉक्टर साहेबांना यायला उशीर होयील. तो पर्यंत त्याचे फोटो ( x - रे) आपण काढुया. अमितचे बाबानी फक्त मान हलवली. मग हॉस्पिटलचे लोक आणि नर्स आली त्यांनी व्हील चेयर वर अमितला बसवले आणि ( x - रे) च्या रूम मध्ये नेले. १० मिनिटात सगळे काम झाले, पण अजून फोटो यायला वेळ लागणार होता . म्हणून पाटील साहेब म्हणाले, अरे रमेश चल काही तरी खाऊन घे, आता इकडे वेळ लागणार आहे, काम करायला अंगात बळ पाहिजे ना..

अमितचे बाबा: हो पाटील साहेब पण इकडे सुद्धा कोण तरी पाहिजे ना.?

पाटील: आपला रामा आहे ना काय रामा?

रामा गडी : होय मालक, मी आहे, तुम्ही दोघे पण काही तरी खाऊन घ्या.

पाटील: बघ रमेश, तु काय चिंता करू नको, हे बघ अखिलेश पण आला. आता काही चिंता नाही. अखिलेश लेगेच काही लागल तर फोन कर!

अखिलेश : हो साहेब काही लागल तर मी फोन करीन.

अमित : अखिलेश एकदा आईला फोन कर ना, ती काळजी करत असेल.

अखिलेश: हो आता करतो.

अखिलेश फोन लावतो, फोनची रिंग वाजते, तिकडून अमितची आई फोन उचलते.

अमित: आई, मी अमित बोलतोय. आता मी ठीक आहे. माझ्या पोटाचा फोटो काढला , पण अजून मोठे डॉक्टर आले नाही, म्हणून थांबलोय.

अमितची आई: बाळा खूप आठवण येते अमितची, लवकर बरा हो रे अमित माझ्या बाळ, (आई रडायला लागते, तीच रडन ऐकून अमित पण रडायला लागतो)

नर्स रडारडी ऐकून आत येते, फोन हिसकावून घेते आणि अखिलेशला ओरडते कि, काय रे पोरा इस्पितळात फोन वर बोलयाच नसत, हे बघ इथे भिंतीवर सगळीकडे लिहलीय. वाचता येते ना?

हो म्याडम माफ करा.

नर्स: ठीक आहे. आता तो फोन ठेव, आणि कोणाचा फोन आला तर बाहेर जाऊन उचल.

हो मॉड़म ठीक आहे. थंकू ऊ

त्यांचे बोलणं होई पर्यंत इतक्यात पाटील आणि अमितचे बाबा आले सुद्धा. त्यांनी विचारले काय रे काय झाले? अखिलेशने सर्व प्रकार सांगितला. पाटील बोलले खरे आहे, आपल्या मुले ईतर रुग्णांना त्रास

नको. अखिलेश तु आणि रामा आता बाहेर बसा. आणि अखिलेश तु घरी सांगितले का ? हो पाटील साहेब. ठीक आहे, घरी जा आराम कर. काही लागले तर अमितचे बाबा फोन करतील. ठीक आहे?

ठीक आहे. पाटील साहेब चला काका (अमितचे बाबा) मी येतो.

रमेश: ठीक आहे बेटा, जा.

अण्णा पाटील : बेटा अमित आज जेव्हा आपण बेवड्याच्या झोपडी जवळून गेलो तेव्हा तुझ्या पोटात जास्त दुखायला लागले का?

अमित: हे हे हे .... असे विचित्र हसत म्हणला... पाटील साहेब. अजून काय अण्णा पाटील.. काय विचारायचा असेल तर विचार थोड्या वेळातच आता डोक्टर येईल मग आपल्याला काही बोलता येणार नाही.

पाटील : अरे अमित मला तु अरे तुरे का करायला लागला?

अमित : कारण मी गणु आहे... अमित नाही (अमितचे डोळे मोठे आणि काळे झाले होते)

पाटील: घाबरून... अरे अस करू नको आपल्या रमेश चा मुलगा आहे. शेवटी तुझं सगळ रमेश आणि जितेंद्र नानानेच केला आहे तुझा.

गणु : हो बरोबर आहे पण अमितला मला बघयाच होत. मी माझ्या झाडावर माझ्या मुलीची वाट बघत होतो. ती तर आली नाही, पण ठीक आहे अमित तर आला.

पाटील: तुझ्या मुलीच्या वया पेक्षा लहान आहे अमित..

अमितचे बाबा : आणि मी सुद्धा कधी कधी तुला दारू साठी पैसे देत होतो.

अमित -गणु: मग....तुला वाटलं मला विकत घेतलं कि काय? हा ...... हे हे हे (जोर जोरात हसायला लागला )

अमितचे बाबा आणि पाटील साहेब यांना घाम फुटला. बाबा तर रडायला लागले. (इतक्यात डॉक्टर आले )

डॉक्टर: अरे रडू नका मला बघू द्या काय झाला ते? नर्स मॅडम x रे आला का?

नर्स: येस सर ..हा बघा

डॉक्टर: अरे बाप रे,,,हा नक्की ह्या मुलाचा आहे?

नर्स: हो मी स्वतः x रे काढायला नेले होते.

अमितचे बाबा: काय झाल आहे डॉक्टर???...रडतच विच्रारले

डॉक्टर : तुमचा मुलगा दारू पितो का?

अमितचे बाबा : कधीच नाही.

डॉक्टर : अहो अश्या गोष्टी पोर सांगत नाही.

अमितचे बाबा : नाही साहेब, हे बघा हे आमच्या गावाचे पाटील आहेत. त्यांनाच विचरा, काही दिवसापूर्वी त्यांनी अमितचा सत्कार केला होता. पाटील साहेब सांगा ना तुम्ही!

अण्णा पाटील : हो हे खर आहे. सगळ्यात गुणी पोरगा आहे. तुम्ही सांगा काय झाला आहे?

डॉक्टर : लिवर प्रोब्लेम ची केस आहे. जास्त दारू पिल्याने त्याचा लिवर वर परीणाम झाला आहे. मी उपचार सुरु करतो. पण कोणीतरी इकडे राहायला पाहिजे, रात्री काय लागल तर स्वाक्षरी वैगरे करायला.

अमितचे बाबा : मी थांबीन

अण्णा पाटील: तस काय असेल तर मी पण थांबतो.

एका वेळी एकच कोण तरी थांबू शकता- डॉक्टर म्हणाले.

मी थांबतोय- अमितचे बाबा. पाटील साहेब तुम्ही घरी जा. काही लागलं तर तुम्हाला फोन करेन.

ठीक आहे. पण मी आता जात नाही इकडे खूप पाहुणे आहेत तिकडेच राहतो. तुम्ही कधी पण फोन करा.

अमितचे बाबा : तुमचे फार उपकार साहेब. पण अमितच्या आईला कोण सांगेल. इकडे काय चाललंय ते? ती उगाच विचार करत बसेल. रात्री जेवण करणार नाही. झोपणार तर नाहीच.

पाटील: एवढंच ना . तुम्ही आता जरा बाहेर या. जरा बोलूया.

ठीक आहे चला

बाहेर गेल्यावर पाटील बोलले 'हे बघ रमेश डॉक्टरने सांगितलं कोण तरी हव आहे बरोबर? म्हणून मी तुझ्या सोबत आहे, अचानक पैसे वैगेर लागले किवा मोठ्या होस्पिटल ला जावे लागल तर ? तुझी आबाळ होयील. आणि तुझ्या घरच्या मंडळी सांगून टेवतो तर मी छोट्या भावाला फोन करीन तु तिच्याशी बोल. ठीक आहे?

अमितचे बाबा : तुमचे फार उपकार साहेब. हे उपकार माझ्या कडून ह्या जन्मी काय फेडता येणार नाही! ( पाटलांच्या पाय पकडतो )

पाटील : अरे हे काय? असं करू नकोस, मी मागच्या वेळी बोललो होतो, अमित माझा मुला सारखा आहे. आणि आता आवर स्वतः ला. आणि मला छोट्या भावाला फोन करु दे. (मिठी मारत)

रमेश : हां पाटील साहेब (डोळे पुसतो)

पाटील: हा नाना, एक काम कर . रमेश च्या घरी जा, तिकडून मला फोन कर. रमेश ला वाहिनी सोबत बोलायचं आहे.

नाना (पाटील साहेबानचा छोटा भाऊ) : हो दादा आता निघतो.

पाटील : ठीक आहे रमेश आता सांग काय करू?

अमितचे बाबा : काही नको साहेब, तुम्ही सोबत आहत हीच मोठी गोष्ट आहे. (डोळ्यात पाणी येत)

पाटील : अरे....अस रडू नको....अमितला काय वाटेल?

रमेश : त्याला काही वाटणार नाही, सध्या त्याचा आत तो सैतान गणु आहे.

पाटील : चल आता आत मध्ये बसू.

रमेश : हो ...चला

रमेश आणि पाटील दोघेपण वार्ड मध्ये जातात..अमित पोटावर हात ठेऊन विव्हळत असतो.

रमेश : अमित बाळा आता लवकर तुला बरे वाटेल हा. नर्स बाई इंजेक्शन दिल आहे.

अमित : अरे रमेश, जरा नशा आली आहे, दारू सारखं वाटत!! त्या नर्स बाईला सांग अजून दोन इंजेक्शन दे, तेव्हा कुठे मला नशा येईल ... श्यस्स्स्सस्स्स्स हि...हि..हि..

हेकडे अखिलेश त्याचा घरी पोचला, त्याने एक दमात काल रात्री जे अनुभव होते सांगितलं, ते सगळे कारनामे ऐकुन अप्पां (अखिलेशचे

बाबा) भडकले, लगेच त्यांनी फेटा गुंडाळला आणि हॉस्पिटलला निघाले.

अप्पां : चावी आन इकडे ( भडकून अखिलेश ला ओरडले)

अखिलेशने गप चावी दिली.

अप्पां : आता ह्या पुढे तुला गाडी मिळणार नाही.

अखिलेश : हो अप्पा .

मंडळी, मी हॉस्पिटलला जातोय त्या मुलाला भेटायला. कधाचीत उशीर होईल तुम्ही जेवण करून घ्या. आणि सारखे सारखे फोन करू नका. समजले का?

अखिलेशची आई : होय, सांभाळून या.

अप्पा : होय.

आत्ता अप्पा हॉस्पिटल ला आले होते, त्यांनी नवीन मुलाची भरती बद्दल विचारले (अमित बद्दल) तेव्हा एका नर्सने अमित कुठे वार्ड मध्ये आहे ते सांगीतल. अप्पा जेव्हा वार्डमध्ये आले तेव्हा त्यांनी लगेच पाटील साहेबांना ओळखले, आणि राम राम पाटील साहेब ! पाटील साहेब : राम राम ...पण मी तुम्हाला ओळखले नाही. माफ करा.

अप्पा : अहो खूप वर्ष झाले तुम्हाला भेटून. ...अहो मी चिन्याचा मामा. विलास भाऊ चा पाहुणा. माझे नाव रामदास. ओळखले का?

पाटील : अरे हो हो....पण भेटून खूप वर्ष झाले ना..म्हणून आठवत नव्हते. ठीक आहे, हे बघ अमितची हालत.

अप्पा : माफ करा माझ्या मुला कडून झाल.

रमेश : अरे अखिलेशची काय चूक ? तो लहान मुलगा आहे.

गणु : –(अमित) : डोळे फिरवत ...त्याला माझ्याकडून धन्यवाद सांगा.

पाटील: तु गप्प राहा गणु.

अप्पा: अरे हा तर अमित ना...मग तुम्ही गणु गणु काय बोलत आहात?

पाटील: अप्पा चल बाहेर तुला सगळं सांगतो. (दोघे बाहेर जातात)

अमित: बाबा, तुम्ही आई सोबत बोलून घ्या. गणु: हो हो ..घे बोलून ती नाही ना इकडे .. श्यस्स्स्सस्स्स्स हि...हि..हि..

रमेश : अरे गणु, माफ कर आम्हाला. तु ह्या नाजूक जीवाला सोडून दे. मी तुझ्या पाया पडतो.

गणु: मला अमितने बोलवले. म्हणून मी आलो. जर त्याने मनापासून बोलावले नसते, तर मी तेव्हाच गेलो असतो.

एवड्यात अप्पा आणि पाटील दोघे पण आत मध्ये आले. रमेश पाटील आणि अप्पा बोलायला लागले ईतक्यात नर्स बोलली एवढे सगळे वार्ड मध्ये पेशंट जवळ थांबु नका. बाहेर जा. लगेच तिघे पण बाहेर जातात. पाटील साहेबांचा फोन वाजतो. नाना (पाटील साहेबानचा साखा छोटा भाऊ) चा फोन असतो. पाटील आणि नाना बोलायला लागतात.

पाटील : अरे नाना पोचला का?

नाना (पाटील साहेबानचा सक्का छोटा भाऊ) : हो दादा . अमितच्या आईला फोन देऊ का. ?

पाटील : हो दे बर.

अमितची आई : नमस्कार पाटील साहेब.

पाटील : नमस्कार वहिनी. आम्ही इकडे पोहचलो. डॉक्टर पण तपासून गेले. आता ठीक आहे अमित काही काळजी करू नका. आणि हो मी स्वतः इथे थांबणार आहे, त्यामुळे कसलीही चिंता करू नका ठीक आहे?

अमितची आई : खूप उपकार साहेब!!

अण्णा पाटील : अमित माझ्या मुलासारखा, सारखं सारखं असे बोलू नका. ते सगळे जाऊ द्या. आणि त्या पुजारीला भेटा. आणि सगळे परीस्थिती सांगा. तशी त्यांना पण माहिती पडल असेलच.

अमितची आई: सगळ्या गावाला माहिती झाली.

अण्णा पाटील : ठीक आहे, नाना ला फोन द्या

नाना: हा अण्णा बोला,...ठीक आहे...हो...आता जातो....हो कळवतो. ठीक आहे.(फोन ठेवतो)

वहिनी मी येतो, दादा तिथेच आहेत, काय निरोप असेल तर मी स्वतः इकडे येऊन सांगिन. काळजी करू नका. काही वाटल तर वाडयावर या. वहिनी साहेब आहेच तिकडे.

अमितची आई: धन्यवाद धाकले मालक.

नाना पाटील : ( बाईक चालू करतो आणि निघतो)

एकडे अमितची आई देवाचा धावा करायला लागते.

नाना पाटील घरी जाण्या अगोदर पुजारीबाबा कडे जातात, त्याला पाटील साहेबानी जे सांगितले ते त्याला सांगतात.

पुजारीबाबा : हो तो गणूच आहे, अमित कडे गणु ची काहीतरी वस्तू आहे. ती जर वाहत्या पाण्यात सोडली, अगेच गणु निघून जायील.

पाटील : ठीक आहे. मी आताच अण्णाना फोन करतो.

पुजारीबाबा : करा कि, धाकले मालक.

पाटील फोन लावतात ४- ५ रिंग वाजून फोन कट होतो, पुन्हा लावतात. अण्णा पाटील लगेच फोन उचलतात.

अरे दादा हे बघ पुजारीबाबा काय म्हनून राहिले, कि अमित कडे गणु ची काहीतरी वस्तू आहे. ती जर वाहत्या पाण्यात सोडली, अगेच गणु निघून जायील.

अण्णा पाटील : अरे अस कस असेल ? तु त्यांना फोन दे बर.

पुजारीबाबा : हा पाटील साहेब बोला.

अण्णा पाटील : बाबा तुम्ही म्हणतात अमित कडे गणु ची काहीतरी वस्तू आहे. ती जर वाहत्या पाण्यात सोडली, अगेच गणु निघून जायील खर आहे का?

पुजारीबाबा : होय पाटील साहेब, खर आहे. पण आता कोण शोधेल? त्याचा दप्तर तपासा किंवा चिन्या ला नाहीतर काय नाव होता त्या दुसऱ्या मुलाचा?

अण्णा पाटील : अखिलेश ?

पुजारीबाबा : हा हा !! तोच तो !!! त्याला विचारा. कुठली गोष्ट त्यांनी घेतली आहे का?

अण्णा पाटील : समजा ती वस्तू आपलल्या सापडली तर काय काय करायाचा?

पुजारीबाबा : एक छोटी ५-१० मिनिटाची पूजा करून वाहत्या पाण्यात सोडयाची. झाला सगळ काम.

अण्णा पाटील : ठीक आहे. मी विचारतो. ठेवा फोन.

पुजारीबाबा : ठीक आहे.

नाना पाटील : काय बोलले अण्णा?

पुजारीबाबा : गणु ला अंगातून कसा बाहेर काढायच, तेच सांगत होतो.

नाना पाटील : बर आहे, राम राम . जर काही लागला तर भेटू.

पुजारीबाबा : राम.... राम....

# इकडे हॉस्पिटल मध्ये

संध्याकाळचे ४ वाजलले असतात, अमित शांत झोपलेला असतो, ते बघून अण्णा पाटील. रमेश ला विचारतात

रमेश , तुला असा काही आठवतय का की गणु ची कुठली गोष्ट आपल्या अमितने घेतली असेल?

रमेश: हम्म्म्म...मला आठवत नाही, पण मी घरी विचारून सागंतो, अरे......पन फोन माझ्या कडेच आहे. आता?

अण्णा पाटील : ठीक आहे मी नाना ला पाठवतो घरी.

रमेश : ठीक आहे.पण तुम्ही असे का विचारले?

अण्णा पाटील : माझा आणि पुजारीबाबाच बोलणं झाला. गावात चर्च्या व्हायला लागलात, तेव्हा पुजारीबाबा म्हटले कि, गण्याची एखादी वस्तू अमित कडे आली आहे . म्हणून गणु आलाय.

अमित (गणु) झोपेतच: अरे रे रे स्स्स्सस्स्स्स...श्यस्स्स्सस्स्स्स त्या बाबाला चागलं कळतंय कि.

रमेश : बाळ अमित.....उठलाय का?

नर्स: पेशंट ला उठवू नका. ५ ला चहा द्याच आहे तेव्हा उठवा.

रमेश गप्प राहतो, तो फक्त अमितच्या डोक्यावरून हांत फिरवत राहतो. मग पाच वाजता सगळीकडे चहा वाल्या पोऱ्या फिरतो,रमेश त्याला विचारतो "नर्स मॉड्म ला विचार आता पेशंट ला चहा साठी उठवले तर चालेल का?"

चहा वाल्या पोऱ्या : अहो काका उठवा कि, सगळे माझीच वाट बघत असतात, जेव्हा मी येतो तेव्हाच त्यांना वाटत कि, ५ वाजले.

रमेश : ठीक आहे, पण मी पेशंटला घेऊन आज सकाळी आलोय ना. तर मला कसे माहित असणार? त्यांना सांग

वार्ड १ मध्ये ५ व्या कोट वर जे पेशंट आहे जे आज सकाळी अडमिट झाले आहेत, त्या पेशंटला उठवले तर चालेल का ? एवढ काम करतो बाळ?

चहा वाल्या पोऱ्या : ठीक आहे. मी विचरून येतो.

चहा वाल्या पोऱ्या काही वेळाने परत येतो. आणि सांगतो कि, नर्स ने तुमच्या पेशंटला उठवायची परवानगी दिली आहे. नाव अमित आहे ना ?

रमेश : हो हो, अमित आहे, माझा मुलगा अमित.

आता रमेश आणि अण्णा पाटील, अमितला उठवतात, अमित उठतो.

रमेश: अमित बाळ चहा पिणार का?

अमित (गणु): काय रे रमेश चहा साठी उठवल उगाच? दारू साठी तरी उठवायचं ...श्यस्स्ससस्स्स

इतक्यात अण्णा पाटील ईशारा करतात, मग रमेश अमित चे खिसे तपासतात.

अमित (गणु) : गणूचे डोळे पूर्ण काळे होतात, अमित (गणु)भडूकून. काय करतोय रमेश. मला जर राग आला ना तुला माहित नाही मी काय करू शकतो?

रमेश : अरे तुझा अवतार ठीक करतोय..केस ...कपडे....सगळे खराब झाले आहेत..( असच करता करता अचानक त्याला एक चांदीची शिट्टी सापडते, लगेच ते चादरीवर टाकतो आणि लपवतो)

इतक्यात चहा वाल्या पोऱ्या येतो, आणि सांगतो कि, नर्स ने सांगितले हो, तुम्ही पेशंटला उठवू शकता चहा नाश्ता देऊ शकता. चहा वाल्या पोऱ्या अमित (गणु) कडे बघतो आणि जोरात घाबरून किंचाळतो अरे बाप रे.......... आणि पळतो, पाटील त्याला बघतो आणि अमित (गणु) च्या बेडपाशी येतो. अमित (गणु) चे मोठे काळे डोळे पाहून अण्णा पाटील आणि रमेश घाबरतात , अण्णा पाटील अमित (गणु) ची वीनवणी करतो कि, अरे गणु, अमित छोटा मुलगा आहे सोड त्याला पण गणु गुरगुरत राहतो, गोंधळ ऐकून नर्स येते, ते बघून अमित चे डोळे नॉर्मल होतात पण त्याची गुरगुर चालू राहते.

नर्स : काय चालल आहे? इकडे अजून पण पेशंट आहे त्याचा तरी विचार करा. तुमच्या मुलाला उठायचा नसेल तर जबरदस्ती करू नका. त्याच पोट कमी दुखाव ह्या साठी आम्ही पेन किलर देले आहे. झोपू द्या. रमेश म्हणाला : हो बाई . माफ करा. रमेश अमितच्या अंगावर चादर टाकतो आणी हळूच ती शिट्टी उचलतो. नर्स बाई आम्ही चहा घेण्यासाठी बाहेर जाऊ का? नर्स : हो, जाऊ शकता. रमेश पाटलांना ईशारा करतात आपण बाहेर जाऊ. पाटील उठतात. अण्णा पाटील

आणि रमेश बाहेर येताच रमेश, अण्णा पाटील ला ती चांदीची शीट्टी दाखवतात आणि सांगतात:-

रमेश : पाटील साहेब ही वस्तू असणार गणु ची , कारण आम्ही कधीही अमितला चांदीची शीट्टी दिली नाही.

अण्णा पाटील : ठीक आहे, मी पुजारीबाबाला फोन करतो आणि विचारतो. असे म्हणून पाटील फोन काढतात आणि पुजारीबाबाला फोन करतात.

अण्णा पाटील : पुजारीबाबा राम राम

पुजारीबाबा : राम राम .

अण्णा पाटील : तुम्हाला अमितच प्रकरन माहिती पडलंच असेल.

पुजारीबाबा : हो हो, धाकले पाटील आले होते त्यांना मी ऊपाय सुद्धा सांगितला.

अण्णा पाटील : हो, त्या बदल बोलयचा होत. आम्हाला एक चांदीची शीट्टी अमितकडे मिळाली आहे, आता पूजा वैगैरे तुम्ही सांगा.

पुजारीबाबा : हे बघा आता वाजले आहेत २:३० तुम्ही लवरकर सामान घेऊन आले तर सगळी पूजा वैगेरेला २ तास लागतील. आता तुम्ही निघाले तर इकडे येण्यासाठी ३:०० ते ३:१५ होतील मग पूजा साठी ५ वाजतील. कारण मी इकडे सर्व तयारच ठेवतो.

अण्णा पाटील : ठीक आहे, मला सामानाची लिस्ट पाठवा, मी रामाला सांगून आणतो.

पुजारीबाबा : ठीक , लगेच पाठवतो.

अण्णा पाटील, रमेश, अप्पा हॉस्पिटल च्या खाली चहा वाल्या पोऱ्याच्या टपरीवर पुढे काय आणि कसे करायचे ते ठरवत होते.

अण्णा पाटील : हे बघ रमेश, त्या पूजेसाठी तु जाने गरजेचे आहे. एक काम कर तु आणि अप्पा एकत्र जा. अप्पा तुझी गाडी आहे ना?

अप्पा: हो. स्कुटी आहे.

अण्णा पाटील : बर आहे, लवकर जाशील. हे बघ मी रामा ला पूजेचे सहित्य आणायला सागितले आहे, तो आता येयील. तु आणि रमेश लगेच निघ. मी अमित जवळ थांबतो.

अप्पा : हो पाटील साहेब.

त्यांच्या गप्पा चालू असताना रामा येतो.

रामा : मालक सगळं सामान आणला, गाडी जुपायाला घेऊ का?

अण्णा पाटील : रामू, आपण नाही रमेश आणि अप्पां, दोघे स्कुटी नी जाणार आहेत. आपण दोघे थांबणार ठीक आहे?

रामा : होय मालक, अजून काय काम असेल तर सांगा मला. मी इकडेच रिकामा बसलोई.

अण्णा पाटील : ठीक आहे. चला तर मग रमेश आणि अप्पा निघा लवकर, आपण अमितला बर करूनच जाऊया. रमेश ते चांदीची शीट्टी महत्वाची आहे निट ठेव.

रमेश : हो घेतलं सगळे.

सगळ्यांच्या डोळ्यात पाणी येत. आणि रमेश व अप्पा स्कुटी वरून निघतात. मोठा रस्तावर येतात.

मग, अण्णा पाटील अमित च्या बेड ठिकाणी जातात. त्यांचा डोळ्यात पाणी असते.

अमित (गणु) : काय अण्णा, तु तर हिरो झाला. एकदम झकास. पण ते दोघे जाणार तर माझ्या झोपडीच्या बाजूने आणि त्या माझ्या आवडत्या झाडाखालून, ही ..ही...ही... श्यस्स्स्सस्स्स्स

अण्णा पाटील सावध होतो, लगेच उठतो आणि बाहेर जातो. बाहेर रामा असतो, अण्णा पाटील रामा ला सांगतो , रामा तु जाऊन अमित च्या बाजूला बस. काही लागलं का इथच ये. मी इकडेच आहे. अण्णा पाटील रमेश ला फोन करतात.

रमेश : पाटील? थांब अप्पा.

अप्पा स्कुटी थांबवतात

रमेश : बोला पाटील साहेब.

पाटील: रमेश, तुला सगळा प्रकार माहित आहे पण त्या गणु ला संशय आलाय. तु आता आपल्या गावातून न जाता तुझा शेत्याचा उलट बाजूने लांबून जा.

रमेश : आलं लक्ष्यात. मी अप्पा ला सांगतो.

पाटील: ठीक आहे. आता फोन ठेवा , आणि काळोख होण्याआधी जा.

रमेश : ठीक आहे पाटील आहे, पुन्हा धन्यवाद.

रमेश सगळं अप्पा ला सांगतो, मग दोघे निघतात.

दोघे रमेश च्या शेत्याचा उलट बाजूने लांबून जातात. आणि गावातल्या हनुमान मंदिरात पोहचतात.

तिकडे पुजारीबाबाने सगळी तयारी केलेली असते.

पुजारीबाबा : अरे रमेश, बर झाल तु पण आलास, नाहीतर तुझ्या बायकोला पूजेसाठी बसाव लागल असते. आता काम कर, पटकन आंघोळ करुन घे त्या हापशीतुन पाणी घे, नवीन धोतर आणलाय ना? मी पाटील साहेबाना सांगितल होत. रमेश लगेच सामान तपासतो. आणि म्हणतो हो हो आणल आहे.

पुजारीबाबा : छान, आता आपण गावच्या नदीवर जाऊन पूजा कर. तयार हो. रमेश लगेच आंघोळ करायला घेतो, पटकन २-३ बादल्या टाकतो, आणि धोतरानी अंग पुसतो, आणि नवीन धोतर नेसतो.

रमेश : आप्पा, लवकर माझ्या घरी जाऊन सांग मी आलो आहे. आणि आमच्या मंडळीना काही प्रश्न असतील तर तिला घेऊन ये.

अप्पां : बर, तुझे काही कपडे आणयचे का?

पुजारीबाबा : नको, फक्त नवीन वस्त्र पाहिजे ते त्याने घातले आहे. रमेश चल जाऊ आपण.

रमेश : हो हो. अप्पां नदीकाठी गोटे असतात, तुझी गाडी तिकडे येणार नाही. तुम्ही गाडी मंदिरात ठेवा आणि मग या.

अप्पां : चालेल. तुम्ही वेळ घालवू नका तुम्ही पुढे जा.

पुजारीबाबा आणि रमेश नदीकडे निघतात.

पुजारीबाबा पूजा मांडतात, आणि मंत्र पुटपुटत असतात. रमेश एक आसन नदीच्या जवळ टाकायला सांगतात, रमेश तसेच करतो, मग रमेश तसच करतो. मग पुजारीबाबा एक होम करतात काही मंत्रोचार चालूच असतात. तिकडे हॉस्पिटल मध्ये अमित -गणु तडफडायला

लागतो, जोर जोरात ओरडतो, हे ऐकून नर्स येते पण अमित -गणु ला बघून ती पण घाबरते, कारण अमितचे डोळे मोठे आणि पूर्ण काळे होतात. नर्स ते बघून ती पण जोरात ओरडते. तिचा आवाज ऐकून एक वार्डबॉय येतो. वार्डबॉय सुद्धा घाबरतो पण स्वत:ला सावरतो.

हिकडे नदीवर अमितची आई पोहचते व पुजारीबाबा ला विचारते कि काय चालेलं आहे? पुजारीबाबा सांगत्तात की सध्या काही बोलू नका, सद्या अमित साठी पूजा चालू आहे. पूजा पूर्ण होते, शेवटी चांदीची शीट्टी वाहत्या पाण्यात सोडली जाते. मग इकडे हॉस्पिटल मध्ये अमित शांत होतो. डोळे नॉर्मल होतात. आणि अमित शांत झोपतो.

आता वार्डबॉयला अंदाज येतो कि काय झाले असेल. नर्स सुद्धा उठून बसते पण अजून घाबरलेली असते. वार्डबॉय तिला सांगतो कि घाबरू नका आता सगळ ठीक आहे. ह्या मुलाचे पुन्हा एकदा x रे काढून बघा. नर्स तयार होते. अमितचे पुन्हा एकदा x रे काढतात, जेव्हा x रे बाहेर येतात तेव्हा नर्स आश्चर्यचकीत होते कारण x रे नॉर्मल आलेले असतात.

ह्या सगळ्या गडबडीत संध्याकाळचे ७ : ३० वाजतात. पूर्ण अंधार पडलेला असतो. सगळे घरी जायला निघतात. इतक्यात रमेश चा फोन वाजतो.

रमेश : हेलो, कोण बोलतय?

नर्स: मी नर्स बोलते आहे. तुम्ही इकडे कोण नाही? तुमचा पेशंट एकटाच आहे. आता डॉक्टर साहेब येतील.

रमेश : अहो तिकडे रामा नावाचा एक माणूस आहे, तो मामा आहे ना पेशंटचा.

नर्स: ठीक आहे मी बघते. (आणि फोन ठेवते)

रमेश : पुजारीबाबा तुम्ही जरा अण्णा पाटील साहेबाना फोन करता का?

पुजारीबाबा : हो, माझा फोन घ्या, मी नंबर लाऊन देतो.

(पुजारीबाबा फोन लावतात, व अमितच्या बाबाला देतात)

रमेश : हेल्लो, पाटील साहेब मी रमेश बोलतो आहे.

अण्णा पाटील : अरे रमेश तुझ्या फोन ला काय झालं?

रमेश : काही नाही बटरी संपली आहे.

अण्णा पाटील : ठीक आहे, फोन का केलास सांग.?

रमेश : काही नाही मी इकडे गावी आलो आहे पण अमित कडे रामा आहे, तर अमितची विचारपूस करायची होती.

अण्णा पाटील : ठीक आहे मी अप्पा ला फोन करतो.

रमेश : अप्पानेच मला मला गावी आनला, ती अमितची पूजा करायची होती? आला लक्षात ?

अण्णा पाटील : अरे हो हो, एक काम कर तु वाडयावर ये.

अप्पां : ठीक आहे साहेब. आता निघतो अमितची आई पण आहे, तिला खूप काही प्रश्न आहेत.

अण्णा पाटील : ठीक आहे , येऊ दे. सगळे.

सगळे पाटलांच्या वाडयाकडे निघतात , हिकडे हॉस्पिटल मध्ये डॉक्टर पोहचतात आणि नर्स मडम ला अमित कसा आहे त्याची काय प्रोग्रस आहे ते पण विचारतात.

मग नर्स सांगते कि, तो (अमित ) झोपला आहे पण मी त्याच पुन्हा एकदा x रे काढले हे बघा.

नर्स x रे दाखवते. डॉक्टर आश्चर्य चकित होतात : हे कसे शक्य आहे?

नर्स: हो ना मला वार्डबॉय ने जागी केल जेव्हा मी बेशुद्ध पडली होती तेव्हा.

डॉक्टर : अच्छा, त्याला सुद्धा बोलवा बर.

वार्डबॉय : डॉक्टरची परवानगी घेऊन आत मध्ये येतो, डॉक्टर विचारतात नक्की काय झाला त्या पेशंटच मला सांग!

वार्डबॉय : डॉक्टर जाऊ द्या आता, तस तुम्ही विश्वास ठेवणार नाही.

डॉक्टर : मला कशावर विश्वास ठेवायचा का नाही ते मी बघेन, मला काय झाला ते सांग, नाहीतर माझ्या न कळत तुम्ही x रे काढला, सरकारची सुविधा गैर मार्गाने वापरली ह्या साठी मी तुम्हा दोघांना सस्पेंड करू शकतो.

वार्डबॉय : (घाबरून) नको डॉक्टर साहेब, माझी मुलगीपण आता १० वी ला आहे तिची शप्पत, मी सांगतो जे मी बघीतल.

डॉक्टर : गुड सांग पट पट मला रौउंड वर जायचा आहे.

वार्डबॉय: सगळ सांगतो आहे पुढे बोलतो कि, अमितच्या बाजूला एक म्हातारे मामा भरती आहेत त्यांनी सुद्धा सगळ बघितल त्यांना पण तुम्ही विचारू शकता.

डॉक्टर : ओके, पण तुला ही कल्पना कुटून सुचली कि, त्याचा नव्याने x रे काढावा.

वार्डबॉय : ते मी, चहा वाल्या पोरांनी सांगितल कि असा असा पेशंट आला आहे त्याचे डोळे असे अचानक काळे आणि मोठे झाले आणि मग तो ईतर पेशंट ला चहा न देताच पळला.

डॉक्टर : ठीक आहे, आता सध्या तु जा, आणि कोणाला काहीही बोलू नकोस.

वार्डबॉय : ठीक आहे.

वार्डबॉय जातो आणि नर्स थांबलेली असते. पण खूप घाबरलेली असते. घाबरूत ती डॉक्टर ला विचारते कि, डॉक्टर आता काय करायच?

डॉक्टर : हे बघा, x रे चा रिपोट नोर्मल आहे, आता पेशंटचे आई वडील आले कि त्यांना सांगूया, उद्या ते पेशंटला घरी नेऊ शकतात.

नर्स : ठीक आहे सर. थंक यु.

इकडे गावात.....

पुजारीबाबा सकट सर्वे मंडळी अण्णा पाटीलच्या वाड्यात पोहचतात. अण्णा पाटील झोपल्यावर बसलेला असतो.

अण्णा पाटील : अरे वा..आले सगळे? राम राम.

पुजारीबाबा, रमेश, अप्पा सर्व एकत्र अण्णा पाटीलला राम राम करतात.

अण्णा पाटील : काय मग पुजारीबाबा, झाली पूजा व्यवस्थित?

पुजारीबाबा : हो, सगळे कार्य मस्त वेळेवर झाले.अगदी बरोबर सुर्यस्था चा वेळेवर झाले.

अण्णा पाटील : म्हणजे आता अमित धोक्याच्या पार आहे, अस म्हटलं तर चालेल?

पुजारीबाबा : हो शंभर टक्के.

अण्णा पाटील : बघ रमेश, आता निर्धास्तपणे राहा.

अमितची आई : कधी एकदा अमित ला बघते अस झालेय.

अण्णा पाटील : त्यात काय एवढ. आता अप्पां जर जाणार असेल तर जा त्याचा सोबत येताना आपला रामा आहेच कि.

अप्पां : हो, मी आता निघत होतो, तुम्ही बोलावलं म्हणून आलो.

रमेश : काय पुजारीबाबा, आता आपल्या गावच्या वाटेने गेले तर चालतंय का?

पुजारीबाबा : हो हो , जा आता काय काय न्हाय.

मग सगळे चहा पितात आणि निघतात.

३०-४० मिनटात अप्पां आणि अमितची आई हॉस्पिटल मध्ये पोहचते.

अमित जागी असतो. अमित कडे सगळे पेशंट बघत असतात.

अमित : आई, तु आलीस? बाबा कुठय?

अमितची आई : अरे बाबा, पाटील साहेबां सोबत आले घरी.

अमित : पण रामा मामा इकडे माझ्या सोबत बसले आहेत.

अमितची आई : हो, कारण पाटील साहेब आणि बाबा अप्पाच्या गाडीवर आलेत.

अमित : अच्चा,चल ना घरी जाऊ. इथले लोक मलाच बघतात खूप वेळा पासून.

अमितची आई : अरे हो, डॉक्टरांनी सांगितलं तर लगेच जाऊ.

डॉक्टर : हो, पण उद्या सकाळी जायचं आहे.

डॉक्टराना बघुन अमितची आई स्टूल वरून उठते आणि नमस्कार करते.

अमितची आई : डॉक्टर साहेब आता ठीक आहे ना अमित?

डॉक्टर : हो फक्त रक्ताचे रिपोर्ट यायचे बाकी आहेत. ते उद्या आले कि अमित घरी येणार. रात्री तुम्ही थांबणार का?

अमितची आई : हो.

डॉक्टर : ठीक आहे, आता त्याला काहीतरी खायाला द्या, त्याचा नंतर नर्स गोळ्या देयील. मग अमित झोपेल.

अमितची आई : धन्यवाद डॉक्टर साहेब.

डॉक्टर : अहो आमचं कामच आहे ते.

डॉक्टर दुसऱ्या पेशंटला बघायला जातात.

अमितची आई कावरी-बावरी होते आणि इकडे तिकडे बघते.

अप्पां : तुम्हा दोघांची जेवण्याची फिकीर करू नका, मी स्वतः घरून डब्बा घेऊन येतो. तुमच्या साठी अंथरून पांघरून, अमित साठी टोवेल पण आणतो. काळजी करू नका.

अमितची आई : लय लय धन्यवाद भाऊ.

अप्पां : (हसत) आता भाऊ पण म्हणता आणि धन्यवाद पण करता.

अमितची आई : हसून...तस नाही, पण एवढी ओळख नसतांना तुम्ही आमच्या साठी खूप केलंय.

अप्पां : अहो, माझी सासरवाडी आहे ती, सासरच्या लोकांना मान – मरताब मिळायाच पाहिजे. आता मी निघतो. तुमच जेवणचा पण बघयाच आहे. चला येतो मी.

अमितची आई : या. आणि रामा च पण बघा.

अप्पां : तुम्ही काळजी करू नका, मी त्याला घरी घेऊन जातोय.

# स्वच्छ सकाळ

सकाळी, अमितची आई उठते, अमित अजून झोपलेला असतो. त्याची आई त्याचा डोक्यावरून हात फिरवते, आणि म्हणते "बाळा आज आपण घरी जाऊया"

नर्स : हो हो आज जा बरे, फक्त डॉक्टर साहेबांना एकदा बघून जाऊ दे.

अमितची आई : हो मॅडम जो पर्यंत डॉक्टर साहेब सोडत नाही तो पर्यन्त जाणार नाही.

नर्स : थोडं स्मित करून. हो आता डॉक्टर येतील १ तासात तेव्हा तुम्हाला भेटायला परवानगी आहे.

अमितची आई : ठीक आहे मॅडम.

ईतक्यात अप्पां येतात.

अप्पां : काय अमित उठला का?

अमित : अ?

अमितची आई : अरे हे अप्पा. ओळखले नाही का? अखिलेशचे बाबा!

अमित : हो हो! ओळखल ना! मला जरा बाथरूमला जायचं आहे.

अमितची आई : हो जा.

अमितची आई सगळं अंथरून पांघरून नीट करते, आवरते.

अप्पां : ताई काल अमित नीट झोपला ना? काही त्रास वगेरे नाही ना झाला?

अमितची आई : अमित शांत झोपला, आणि माझा मुलगा आहे, कसला त्रास ?

अप्पां : विचारले. ठीक आहे, मी फोन करते अण्णा पाटीलला. असे म्हणून अण्णा पाटील ला फोन लावतात आणि बाहेर जातात.

अण्णा पाटील : बोल अप्पा, सकाळी सकाळी, काय पुन्हा गडबड झाली कि काय गणूं ची?

अप्पां : तस काही नाही. या उलट अमित चांगला झोपला, आता तोंड धुतोय. डॉक्टर साहेब आले कि घरी सोडतील.

अण्णा पाटील : बर आता मला का फोन केला?

अप्पां : रामा माझ्या घरी थांबला होता, अमित ला सोडलं तर त्याला आपल्या गावच्या रस्त्यांनी पाठयाच कि, आत आतमधल्या ? तेच विचारायचं होत म्हणून फोन केला.

अण्णा पाटील : काल तुम्हाला त्या गावच्या रस्त्यांने काही त्रास झाला नाही ना?

अप्पां : अजिबात नाही.

अण्णा पाटील : मग पाठव तीकडून मी रामासोबत बोलतो, घरी गेल्यावर रामा सोबत बोलने करून दे माझे.

अप्पां : हो साहेब. ठेवू आता?

अण्णा पाटील : अरे ऐक, मी आणि रमेश इकडे आहोत, आता पैशाच काही लागल तर सांभाळ, मी या आठवड्यात तिकडे, तेव्हा तुला देतो.

अप्पां : काय पाटील साहेब लाजवता , अमित पण माझ्या पोरा सारखा, त्याची आई पण बहिणी सारखी , वरून ते माझे पण सासरवाडी आहे. मी करतो सगळ. काही काळजी करू नका.

ईतक्यात डॉक्टर साहेबांची गाडी येते. अप्पां फोन ठेवतो आंणी डॉक्टरर्नाच्या मागे पळतो.

डॉक्टर : अहो कोण तुम्ही? मागे येऊ नका.

अप्पां : डॉक्टर साहेब आता अमित ला ठीक वाटतय ना? त्याला घरी घेऊन जाऊ शकतो ना?

डॉक्टर : अच्चा तुम्ही कोण अमितचे?

अप्पां: मी मामा.

डॉक्टर : मला एकदा अमित ला तपासू द्या, विचारू द्या, सगळ ठीक असेल तर घेऊन जाऊ शकता.

अप्पां : खूप खूप उपकार साहेब.

डॉक्टर : आता मला पेशंट ला तपासायच आहे, जरा....बाजूला व्हा. नंतर केबीन मध्ये विचारा.

अप्पां : होय होय.

अमितच्या बेड जवळ येतात, अमित पण दात घासून तोंड धुऊन आलेला असतो.

डॉक्टर : (अमित ला) काय मग अमित, आता १०व चा अभ्यास करायला रेडी?

अमित : होय डॉक्टर!

डॉक्टर: गुड. नर्स एकदा बिपी चेक करतील तो नॉर्मल असेल तर जायचं तयारी करायाची! ओके!

अमित : ओके डॉक्टर, थं ॅक ऊ सो मच!

डॉक्टर: नर्स, अमितच बिपी घ्या.

नर्स बिपी चेक करते आणि डॉक्टरांना सांगते कि, बिपी नॉर्मल आहे.

डॉक्टर : गुड, अमितचे डिस्चार्ज पेपर बनवा.

नर्स : हो सर.

डॉक्टर : तुम्हाला काही विचरायचे असेल तर विचारा.

अमितची आई : साहेब गोळ्या वैगेरे ?

डॉक्टर : हो, फक्त विटामिन आणि कॅलशीम ची आहे. एका महिना घ्या. नतर काही गरज नाही. पुन्हा लागले तर या.

अमितची आई : धन्यवाद डॉक्टर साहेब.

अमितची आई सगळे अंथरून पांघरून एका कापडाच्या पिशवी मध्ये टाकते, अमितच्या चपला काढते, आणि अमितला घालयला सांगते. नर्स डिस्चार्ज पेपर घेऊन तयार असते, ती अमितची आईला एक

स्वाक्षरी करायला सांगते. त्या ईवजी अप्पां करतात. इतक्यात रामा येतो.

रामा : अमित बाळ , आता कस वाटतय?

अमित : आता मस्त आहे मी, चला रामा मामा आता घरी जाऊ, इकडे खूप वास येतोई गोळ्यांचा, इंजेक्शन चा पण ,

रामा : हो हो बाळा, जाऊ हा आता.

अप्पां : (अमितच्या आई ला ) चला, कपड्याची बांधाबांध झाली, आपण दोघे जाऊन डॉक्टर साबेना सोबत बोलूया.

अमितची आई : हो भाऊ चला.

दोघे डॉक्टरांची परवानगी घेऊन डॉक्टरच्या केबिन मध्ये जातात.

डॉक्टर : हे बघा काळजी करण्याची गरज नाही. सगळे रिपोर्ट नॉर्मल आले. आता फक्त विटामिन आणि कॅलशीम ची कमी आहे, त्या गोळ्या १ महिनाभर द्या. निट वाटेल त्याला. सध्या कुठे बाहेर पाठवू नका. ठीक आहे?

अमितची आई आणि अप्पा.: नक्की डॉक्टर साहेब, खूप खूप उपकार झाले तुमचे.

डॉक्टर : अहो उपकार कांय? मी सरकारी कर्मचारी, मी माझ काम केल. जातान तेवढं x रे चे पैसे भरून जा.

अमितची आई अप्पा कडे बघते.

अप्पां : हो हो. किती झाले?

डॉक्टर : ते तुम्हला खाली समजेल , ठीक आहे? या आता.

अप्पां : ओके डॉक्टर.

खाली अमित कापडाची पिशवी घेऊन तयार असतो. अमितची आई आणि अप्पा खाली येतात. अप्पा दोघांना सांगतात, तुम्ही १० मिनट थांबा मी x रे चे पैसे भरून येतो. आणि रामा ला सांगा गाडी जोडीयला.

अमितची आई : ठीक आहे.

अमितची आई रामा ला : रामा भाऊ, चला तयारी करूया. आपल्याला घरी जायचं आहे, गाडी तयार करा.

रामा : हो हो ताई, गाडी तयारच आहे. अप्पांना येऊ दया. त्यांना धन्यवाद म्हणू द्या. त्यांनी काल रात्री त्यांनी

मला माझ्या भावासारखा सांभाळून घेतलं.

अमितची आई : हो हो थांबूया.

अप्पां : ताई, चला आता. कोणसाठी थांबतात?

रामा : कोणासाठी नाही, फक्त तुम्हाला राम राम करण्यासाठी.

अप्पां : अरे तुम्ही माझे भाऊ आणि बहिण आहे. तुमच कसले? राम राम ? चला आता निघूया.

रामा : हो, चला चला.

अप्पां मग लगेच अण्णा पाटीलांना फोन लावतात आणि सांगतात कि, रामा, अमितची आई, अमित निघाली आहे आता. घरी पोचल्यावर कॅल करा.

अण्णा पाटील : होय होय, तुमचे खूप धन्यवाद अप्पां.

अप्पां : काय पाटील साहेब.

इकडे ३०-४० मिनटात बैल गाडी पोहचते, मग ५ मिनिटात अमितचे शेत लागते, अमित कान बंद करतो. त्याला ही ..ही...ही... श्यस्स्स्सस्स्स्स असा आवाज येत नाही. त्यालाच काय गाडीत बसलेल्या कोणालाही येत नाही.

रामा गाडी अमित च्या घरासमोर थांबतो. घरामध्ये रमेश असतो तो बाहेर येतो. अमित ला बघून त्याचे डोळे पाणावतात. आई सुद्धा रडायला लागते. रामा सुद्धा थांबतो, पण अमितला विचारतो चल अमित बाळ येतो का पाटलांच्या वाड्यावर? अमित त्याचा आई-बाबांकडे बघायला लागतो, रमेश अमित ला जवळ घेतो आणि म्हणतो, आम्ही ३-४ वाजता येऊ. ठीक आहे?

रामा : ठीक आहे, आम्ही वाट बघतोय. चल काळजी घे. आराम कर.

अमित, बाबा, आणि आई एकमेकांना घट्ट मिठी मारतात.